



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - २ रे ❏ अंक -३०६ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६


## वाद पेटला! दिल्लीतील कॉलेजला सावरकरांऐवजी मनमोहन सिंग यांचे नाव द्या, काँग्रेसचे थेट पंतप्रधान मोदींना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ नवी दिल्ली**

देशात पुन्हा एकदा वीर सावरकर यांच्यावरून सत्ताधारी भाजपा आणि विरोधी काँग्रेस यांच्यात वाद उभा राहिला आहे. दिल्ली विद्यापीठाच्या एका कॉलेजला वीर सावरकर नाव देण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी दिल्ली विद्यापीठाच्या २ नव्या कॅम्पस अन् कॉलेजचं भूमिपूजन केले. या नव्या कॉलेजला वीर सावरकर यांचं नाव देण्यात येणार असल्याचं समोर आल्यानंतर काँग्रेसच्या युवक



संघटनेने यावर आक्षेप घेतला.

काँग्रेसनं वीर सावरकर यांच्याऐवजी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं नाव कॉलेजला द्यावे अशी मागणी केली आहे. याबाबत काँग्रेस युवक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष वरूण चौधरी यांनी एक पत्र लिहिलं आहे. त्यात मनमोहन सिंग यांनी शिक्षण आणि प्रशासन यात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची आठवण करून दिली आहे. मनमोहन सिंग यांची शैक्षणिक पार्श्वभूमी मोठी आहे. त्यांच्या कारकिर्दीत राईट टू एज्युकेशन एक्ट आणि सेंट्रल यूनिवर्सिटी एक्ट आणले गेले. त्यामुळे नव्या कॉलेजला त्यांचे नाव देणे त्यांच्यासाठी मोठी श्रद्धांजली ठरेल. त्यामुळे येणाऱ्या पिढीला प्रेरणा मिळेल असं त्यांनी सांगितले.

तर भाजपा केवळ फित कापण्याचं राजकारण करते. गेल्या ११ वर्षात सावरकर यांच्या नावाने कुठलीही योजना भाजपा सरकारने केली नाही. सावरकरांचे इंग्रजांसोबत काय संबंध होते हे देशाला माहिती आहे असं विधान काँग्रेस प्रवक्ते अलोक शर्मा यांनी केले आहे. त्यामुळे वीर सावरकर नावावरून काँग्रेस आणि भाजपा यांच्यात पुन्हा वाद होण्याची शक्यता आहे.

**१४० कोटींमध्ये बनणार वीर सावरकर कॉलेज**

दरम्यान, दिल्ली विद्यापीठाचं वीर सावरकर कॉलेज नजफगड येथे बनणार आहे. विद्यापीठाच्या पश्चिमी कॅम्पेसपासून ५ मिनिटाच्या अंतरावर हे कॉलेज असेल. या कॉलेजच्या बांधकामासाठी जवळपास १४० कोटी रुपये अंदाजित खर्च आहे. या नव्या कॉलेजमध्ये २४ वर्ग, ८ ट्यूटोरियल रुम्स, एक कॅन्टिन, ४० फॅकल्टी रुम, लायब्रेरी आणि कॉन्फरन्स रूम इत्यादी सुविधा असतील. या कॉलेजला वीर सावरकर नाव देण्यात येणार असून त्याला काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. वीर सावरकर यांच्याऐवजी मनमोहन सिंग यांचं नाव कॉलेजला देण्यात यावे अशी मागणी काँग्रेसच्या युवक संघटनेने केली आहे.

## वर्षभराचं टार्गेट सहा महिन्यांत पूर्ण, परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र अव्वल; देवेंद्र फडणवीसांनी दिली आकडेवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ मुंबई**

राज्यातील उद्योगधंदे परराज्यात जात असल्यावरून महाराष्ट्र सरकारवर सातत्याने टीका होत असताना आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंदाची बातमी दिली आहे. सहा महिन्यांतील परदेशी गुंतवणूक वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के जमा झाली आहे. अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली.

महाराष्ट्र आता थांबणार नाही! वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के एफडीआय अवघ्या ६ महिन्यांत, असं म्हणत देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुन्हा



अतिशय आनंदाने सांगतो की, आपला महाराष्ट्र सातत्याने परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करण्यात अग्रेसर आहे. आता २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सप्टेंबरला संपलेल्या दुसर्या तिमाहीची आकडेवारी आली आहे. त्यात अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या ४ वर्षांतील सरासरी पाहिली तर १,१९,५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४.७१ टक्के गुंतवणूक ही फक्त ६ महिन्यात आली आहे. मी महाराष्ट्राचे मन:पूर्वक अभिनंदन करतो माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाही देतो.देवेंद्र फडणवीसांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, सहा महिन्यांतील परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र एक नंबरला असताना कर्नाटक दुसऱ्या, गुजरात तिसऱ्या, दिल्ली चौथ्या आणि तामिळनाडू पाचव्या क्रमांकावर आहे.

## धनंजय मुंडे-पंकजा मुंडेंचा पत्ता कट?

### अजित पवार बीडचे पालकमंत्रिपद घेण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३बीड**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमधील सामाजिक आणि राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. या हत्या प्रकरणासह पवनचक्की खंडणी प्रकरणातील आरोपी हे राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचे असल्याने मुंडे यांना मंत्रिपदावरून हटवा, अशी मागणी जोर धरत आहे. तर दुसरीकडे, बीडमधील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी जिल्ह्याचं पालकमंत्रिपद मुंडे बहीण-भावाला न देता महायुतीच्या प्रमुख नेत्यांपैकी कोणीही घ्यावं, अशी मागणी जिल्ह्यातील सर्वपक्षीय आमदारांकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे स्वत: बीडचे पालकमंत्री होण्याची शक्यता आहे.

बीडच्या पालकमंत्रिपदाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा झाल्याची माहिती आहे. या चर्चेतून बीडचं पालकमंत्रिपद धनंजय मुंडे किंवा पंकजा मुंडे यांना न देण्यावर



मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांमध्ये एकमत झाले असल्याचे समजते. जिल्ह्यात घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी बीडचं पालकमंत्रिपद अजित पवार स्वत:कडे घेऊ शकतात. याबाबत 'न्यूज१८ लोकमत'ने वृत्त दिलं आहे.

दरम्यान, मंत्रिमंडळ विस्ताराला दोन आठवडे उलटल्यानंतरही राज्यात अद्याप पालकमंत्र्यांची घोषणा झालेली नाही. सत्ताधारी महायुतीत तीन पक्ष असल्याने कोणत्या पक्षाकडे कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद द्यायचं, याबाबत अजूनही खल सुरू आहे. येत्या काही दिवसांत याबाबतची घोषणा होण्याची शक्यता आहे.

**मंत्रिपदाच्या राजीनाम्यावर धनंजय मुंडेंचं मत काय?**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात माझा काहीही संबंध नसताना मी राजीनामा द्यावा तर का द्यावा, असा सवाल धनंजय मुंडे यांनी विरोधकांना केला आहे. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडला अटक झाली असली तरी त्याला वाचविण्याचा प्रयत्न मुंडे करत असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. त्याला मुंडेंनी गुरुवारी मंत्रिमंडळ बैठक संपल्यानंतर माध्यमांशी बोलताना उत्तर दिले. संतोष देशमुख यांची हत्या ज्यांनी केली त्यांच्या विरोधात फास्ट ट्रॅक कोर्टात केस चालवावी आणि आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी मी यापूर्वीच केली आहे. त्यामुळे कोणी काय बोलावे आणि कोणाचे काय होणार? याला काहीही अर्थ नाही, असं मुंडे म्हणाले.

## 'कोठडीत २४ तास मदतनीस हवा', वाल्मीक कराडची न्यायालयात मागणी; कोर्टाने मागणी फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३बीड**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सीआयडीने वाल्मीक कराड याची चौकशी सुरू आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी कराड याने पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण केले. कोर्टाने त्याला १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. त्याच दिवशी वाल्मीक कराड याने कोर्टाकडे २४ तास एका मदतनीसाची मागणी केली होती. ही मागणी कोर्टाने फेटाळून



लावल्याची माहिती समोर आली आहे.

वाल्मीक कराड याला ३१ डिसेंबर दिवशी रात्री बीड येथील कोर्टात हजर करण्यात आले. कोर्टाने कराड याला १४ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली. यानंतर कराड याने पोलिसांकडे काही सुविधांच्या मागण्या केल्या होत्या. कोठडीत आपल्याला २४ तास मदतनीस मिळावा अशी मागणी त्याने केली होती. न्यायालयाने ही मागणी फेटाळली आहे. वाल्मीक कराड याने आपल्याला स्लीप ॲप्रिया हा आजार असल्याचे सांगितले आहे. या आजारामध्ये झोपताना मशीन लावावी लावण्याची गरज असते. यात ऑटो सीपॅप ही मशीन लावावी लागते. ती मशीन हाताळण्यासाठी २४ तास एक मदतनीशाची आवश्यक्ता असते. यासाठी एक मदतनीस देण्यात यावा अशी मागणी कराड याने केली होती. ही मागणी न्यायालयाने फेटाळून लावल्याचे सांगण्यात येत आहे.


**विष्णू चाटे याने दिली कबुली**

वाल्मीक कराड याने पवनचक्कीच्या अधिकाऱ्यांसोबत फोनवर संभाषण केले होते, अशी कबुली विष्णू चाटे याने चौकशीत दिली आहे. विष्णू चाटे याच्या मोबाईलवरुन पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांना धमकी दिल्याचा आरोप केल्याचे तक्रारीमध्ये म्हटले होते. दरम्यान, आता विष्णू चाटेने याबाबत कबुली दिली आहे. याबाबतचा अहवाल सीआयडीने न्यायालयात अहवाल सादर केला आहे.

## वाकीफ कहां जमाना हमारी.., भुजबळांकडून फडणवीसांचं कौतुक अन् शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३सातारा**

वाकीफ कहां जमाना हमारी उडान से.. वो और थे जो हार गए आसमान से.. या पद्धतीने आपण काम करत आहात यशस्वी व्हा, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे आयोजित जयंती उत्सवात भुजबळ बोलत होते. यावेळी




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आदी उपस्थित होते. दरम्यान, मंत्रिमंडळात डावलले गेल्याने भुजबळ नाराज आहेत. त्यामुळे भुजबळ काय बोलतील याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष होतं. भुजबळांनी मात्र आपल्या भाषणात सरकारची पाठ थोपटली.

भुजबळ पुढे म्हणाले, राज्यातील युवकांच्या सबलीकरणासाठी महाज्योतीला साडेचारशे कोटींचा निधी दिला. पुण्यातील भिडे वाड्याचं काम आपण मार्गी लावलं. त्यावेळीही मी विरोधी पक्षातच होतो. नंतर चंद्रकांत पाटील यांनीही त्यात लक्ष घातलं. कोर्टातूनही न्याय मिळाला. यानंतर आता काम मार्गी लागलं आहे.राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी सुरू करण्यासाठी दोनशे कोटींची तरतूद आहे. यासाठी साधारण दहा एकर जमिनीची आवश्यकता आहे. आता यासाठी जर ताबडतोब जागा दिली तर हे काम सुद्धा मार्गी लागेल यात शंका नाही. मुली सुद्धा एनडीएत शिक्षण घेऊन प्रशिक्षित होऊन बाहेर पडतील असा विश्वास भुजबळांनी व्यक्त केला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने आधी पुरस्कार दिला जात होता. तो आता बंद आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की आता तुम्ही बंद पडलेले पुरस्कार याच दिवशी म्हणजे ३ जानेवारीला दिले जातील अशी ऑर्डर काढा. येथे सगळे साताऱ्याचे मंत्रीही आहेत. मला खात्री आहे तुमच्या नेतृत्वात काम नक्की होईल, असे छगन भुजबळ यांनी सांगितले.

## 'मातोश्री'वरील मारहाणीची ती चर्चा खोटी : राऊत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ मुंबई**

उद्धवसेनेचे नेते खा. संजय राऊत यांना मातोश्रीवर मारहाण झाल्याची बोंब सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. यावर खा. राऊत यांनी गुरुवारी ही बातमी खोटी असल्याचे स्पष्टीकरण केले. तसेच, भाजपच्या आयटीसेलनेच खोट्या बातम्या पसरविल्या, असा आरोपही त्यांनी केला.

'मातोश्री'वर उद्धव ठाकरे यांनी नेत्यांची बैठक घेतली



होती. त्यावेळी राऊत आणि अन्य नेत्यांमध्ये वाद झाला. त्यानंतर राऊत यांना मारहाण करण्यात आली, अशी पोस्ट व्हायरल झाली होती. त्याबद्दल स्पष्टीकरण करताना राऊत म्हणाले, गेले काही दिवस मी मुंबईबाहेर असून आज मुंबईत परत आलो आहे. मातोश्री येथे अशी कोणतीही बैठक झाली नाही. महापालिका निवडणुकीसाठी आम्ही तयारी सुरू केली आहे. त्यासाठी ठाकरे प्रत्येकाशी भेटून चर्चा करत आहेत. विधानसभेत अपयश का आले? याचे कारण सर्वांना माहीत आहे. तोच प्रयोग महापालिका निवडणुकीतही होणार आहे परंतु, आम्ही संघर्ष करू आणि जिंकू, असे राऊत यांनी सांगितले.

**बदनामीची ही नवी मोहीम, आनंद घ्या**

बीडमधील सरपंचाच्या हत्येचा राज्य सरकारच्या एका मंत्र्याशी संबंध आहे. त्यामुळे लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी भाजपचा आयटी सेल अशा बातम्या पसरवत आहे. माझ्याविरोधात आता ही नवी मोहीम राबवणार असाल तर त्याचा आनंद घ्या, असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला.

## फडणवीसांचं उशीरा कौतुक केलं पण.... आभार मानत भाजप नेत्याचा ठाकरेंना टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुंबई**

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी पालकमंत्री व्हायला आवडेल अशी इच्छाही व्यक्त केली. त्यानंतर आज शिवसेनेच्या सामना या दैनिकातून चक्क फडणवीसांचं कौतुक करण्यात आलं. राजकारणात दुर्मिळ



वाटणारी ही घटना आज घडली. यानंतर भाजप नेते आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही सामनाचे आभार मानले आहेत.

**सामनात नेमकं काय म्हटलं?**

गडचिरोली हा महाराष्ट्राचा शेवटचा नव्हे तर पहिला जिल्हा म्हणून ओळखला जावा, यासाठी फडणवीस प्रयत्न करणार आहेत. ते चुकीचे नाही. फक्त गडचिरोलीच्या विकासाचा हा विडा आपण तेथील सामान्य जनता आणि गरीब आदिवासी यांच्यासाठीच उचलला आहे, कोणा खाणसम्राटांसाठी नाही, हे दाखवून देण्याची काळजी देवाभाऊंना घ्यावी लागेल. तरच नवीन वर्षाच्या सूर्योदयापासून गडचिरोलीच्या परिवर्तनाची सुरुवात झाली आहे, हा त्यांचा वादा खरा होईल. बीडमध्ये बंदुकीचे राज्य कायम असले तरी गडचिरोलीत संविधानाचे राज्य येत असेल तर मुख्यमंत्री फडणवीस कौतुकास पात्र आहेत, असे 'सामना'च्या अग्रलेखात म्हटले आहे.

## संपादकीय ......

# नदीजोड प्रकल्पातून विकासगंगा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर नद्याजोड प्रकल्पाचा संकल्प बोलून दाखवला आहे. नदीजोड प्रकल्प हा मराठवाड्यासाठी भाग्यविधाता प्रकल्प असणार आहे. मध्य प्रदेश, राजस्थान यादरम्यान वाहणार्या पार्वती, कालीसिंध आणि चंबळ नद्यांचे पाणी हे मोठा जलस्रोत म्हणून पाहिले जाते. या नद्यांना जोडण्यासाठी अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिपूजन केले.

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी नदीजोड प्रकल्पाच्या अभियानाची संकल्पना मांडली आणि त्यास नरेंद्र मोदी यांनी मूर्त रूप दिले. याचा प्रारंभ केन-बेतवा नदी जोड प्रकल्पाने केला होता. या योजना जलशक्ती अभियान 'कॅच द रेन' या अभियानार्तंगत राबविल्या जात आहेत. पूर आणि दुष्काळाने त्रस्त या देशात नदी जोड प्रकल्पाला यश आले तर ५७ अन्य नद्या जोडण्याचा मार्गही मोकळा होईल. मध्य प्रदेश, राजस्थान यादरम्यान वाहणार्या पार्वती, कालीसिंध आणि चंबळ नद्यांचे पाणी हे मोठा जलस्रोत म्हणून पाहिले जाते. या नद्यांना जोडण्यासाठी अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिपूजन केले. याचे प्रतीक म्हणून तिन्ही नद्यांचे पाणी एका कलशात भरले. यानंतर भारत सरकार, राजस्थान आणि मध्य प्रदेश सरकार यांच्यात त्रिपक्षीय करार झाला. या प्रकल्पावर ७२ हजार कोटी रुपये खर्च होण्याची अपेक्षा आहे आणि त्यात ९० टक्के रक्कम केंद्र सरकार देईल. यामुळे मध्य प्रदेशातील १३ जिल्ह्यांतील ३ हजार २१७ गावांचा चेहरामोहरा बदलणार आहे. दोन्ही राज्यांत २८ नवीन धरणे उभारण्यात येणार असून चार जुन्या धरणांची साठवण क्षमता वाढविली जाईल. त्याचबरोबर सध्याच्या चंबळ कालवा प्रकल्पाचा जीर्णोद्धार केला जाईल. या नद्या ठराविक वेळेत एकमेकांना जोडल्यास कृषी भूमी ओलिताखाली येण्याचे प्रमाण वाढेल आणि साहजिकच अन्नधान्याचे उत्पादन वाढेल.

नदी जोड प्रकल्पाचा प्रारंभ केन-बेतवा नदी जोड प्रकल्पाने केला होता. या योजना जलशक्ती अभियान 'कॅच द रन' या अभियानार्तंगत राबविल्या जात आहेत. पूर आणि दुष्काळाने त्रस्त या देशात नदी जोड प्रकल्पाला यश आले तर५७ अन्य नद्या जोडण्याचा मार्ग देखील मोकळा होईल. वास्तविक हवामान बदल आणि बदलणारे पावसाचे वेळापत्रक पाहता नद्यांतील पुराचे पाणी अडविण्याचे काम करणे आवश्यक आहे. हे पाणी दुष्काळग्रस्त भागातील कालव्यात सोडले जाईल. वास्तविक भारतात जगातील एकूण लोकसंख्येच्या सुमारे १८ टक्के नागरिक राहतात आणि यासाठी पिण्यायोग्य पाणी केवळ चार टक्के आहे. अर्थात पर्यावरणवादी या प्रकल्पाला विरोध करत आहेत. नदी जोड प्रकल्पामुळे त्यांचा प्रवाह थांबेल आणि त्या कालांतराने इतिहासजमा होतील अशी भीती व्यक्त होत आहे.

नर्मदा आणि क्षिप्रा नद्यांना जोडण्याचे काम तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सुरू केले होते. या दोन्ही नद्या मध्य प्रदेशमध्ये वाहत असल्याने त्यांना जोडणे शक्य झाले. तसेच केन आणि बेतवा नद्यांना जोडण्याची तयारी मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश सरकार पूर्वीपासूनच करत होते. या प्रकल्पाला २००५ मध्ये मंजुरी मिळाली, मात्र पाणी वाटपावरून वाद झाला. कालांतराने राजकीय स्थिती बदलली आणि प्रकल्पावर मतैक्य झाले. केन नदी जबलपूरजवळील कैमूरच्या पर्वतरांगात उगम पावत ती ४२७ किलोमीटर उत्तरकडे वाहत जाते आणि नंतर ती बांदा जिल्ह्यातील हमीरपूर येथे यमुनेला मिळते. केन बेतवा नदी जोड प्रकल्पावर धरणांची उभारणी आणि कालव्याचे काम सुरू झाले आहे.

दक्षिणेतील महासागर, हिमकडे, नदी आणि तेथे सरोवरात मोठा जलसाठा आहे. परंतु मानवासाठी जीवनदायी असलेले पाणी आणि वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्धतेचे बिघडणारे गणित पाहता चिंतेत भर पडत आहे. अशावेळी वाढत्या तापमानामुळे हिमकडे वितळण्याच्या घटना घडत आहे. शिवाय पाऊस न झाल्याने आटत जाणार्या जलस्रोतांची संख्याही वाढत आहे. सध्याच्या काळात पाण्याचा वापर कृषी, विद्युत आणि पेयजलच्या रूपातून सर्वाधिक केला जात आहे. अर्थात पिण्यासाठी पाण्याचा वापर केवळ आठ टक्के असून त्याचा प्रमुख स्रोत नदी आणि भूजल आहे. औद्योगीकरण, शहरीकरण आणि वाढत्या लोकसंख्येच्या दबावामुळे एकीकडे नद्यांचा आकार कमी होत आहे, त्याचवेळी औद्योगिक कचरा आणि सांडपाणी सोडले जात असल्याने गंगा आणि यमुना नद्या प्रदूषित होत आहेत.

हिमालय भागातील नद्यांचे अतिरिक्त पाणी संकलीत करण्याच्या दृष्टीने भारत, नेपाळमध्ये गंगा, यमुना, ब्रह्मपुत्र तसेच त्यांच्या उपनद्यांचा मोठा जलाशय उभारण्याची तयारी केली जात आहे. यानुसार पावसाचे पाणी जमा केले जाईल आणि उत्तर प्रदेश, बिहार आणि आसामची भयंकर पुरापासून सुटका मिळेल. या जलाशयापासून वीज निर्मिती केली जाईल. या क्षेत्रात कोसी, घाघरा, मेच, गंदक, साबरमती, शरदा, फरक्का, सुंदरबन, स्वर्णरेखा आणि दामोदर नद्यांना गंगा, यमुना आणि महानदीला जोडले जाईल. सुमारे १३ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या या नद्या भारतातील संपूर्ण सखल भागात वाहतात. त्याचवेळी २ हजार ५२८ लाख हेक्टर जमीन आणि वनजमिनीतून वाहणार्या या नदीत प्रतिव्यक्तीसाठी ६९० घनमीटर पाणी उपलब्ध आहे. कृषीयोग्य ५४६ लाख हेक्टर जमिनीत याच पाण्यातून सिंचन होते. नद्याच्या महापुराचे पाणी गोळा करून त्याला दुष्काळग्रस्त भागातील कालव्यामार्फत सोडण्याची योजना आहे. अशावेळी पिण्याच्या पाण्याची समस्या कमी होईल आणि सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळेल. म्हणूनच नदी जोड प्रकल्प हे भविष्यासाठी लाभदायी मानले जात आहेत.

### पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात


# आंतरराष्ट्रीय स्तरावरील मायक्रोसॉफ्ट डॉटनेट कॉन्फरन्स २०२५ चे आयोजन

## विद्यार्थ्यांना मिळणार तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण ज्ञान आणि संवादासाठी व्यासपीठ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती –** पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील विद्यार्थ्यांच्या मायक्रोसॉफ्ट लर्न स्टुडंट क्लब (चङडउ) अंतर्गत दिनांक ९ जानेवारी २०२५ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधीत मायक्रोसॉफ्ट डॉट नेट कॉन्फरन्स २०२५ भव्य परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेत मायकोसॉफ्ट डॉट नेट तंत्रज्ञानाशी संबंधित नव्या कल्पना, साधने आणि उपाय यांवर चर्चा होणार आहे.

मायकोसॉफ्ट डॉट नेट कॉन्फरन्स ही मुख्यतः विद्यार्थी, सॉफ्टवेअर डेव्हलपर, तंत्रज्ञानप्रेमी यांसाठी खास रचलेली आहे. या परिषदेत मायक्रोसॉफ्ट कोपायलट, पॉवर बीआय, गिटहब, जनरेटिव्ह एआय आणि सायबरसुरक्षा या अत्याधुनिक तंत्रज्ञानांवर सखोल चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत.





या तीन दिवसीय परिषदेमध्ये पहिल्या दिवशी प्रमुख वक्ते प्रफुल्ल मानेकर, सहसंस्थापक, सोहम ग्लोबल अँड स्पायडर प्रोजेक्ट वन उपस्थित राहणार आहेत. ते उद्योग क्षेत्रातील त्यांच्या अनुभवांवर आधारित डॉट नेट (.छएढ ) तंत्रज्ञानाच्या उपयोगांवर सखोल मार्गदर्शन करतील. त्यांच्या सत्राद्वारे उपस्थितांना स्टार्टअप्ससाठी डॉट नेट (.छएढ) चा कसा उपयोग करता येईल याची माहिती दिली जाणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी लक्षित पंत, सीपीएम हेड, मायक्रोसॉफ्ट यांचे व्याख्यान होईल. लक्षित पंत हे त्यांच्या मार्गदर्शनातून आधुनिक सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट तंत्र, मायक्रोसॉफ्ट कोपायलट आणि पॉवर बीआय यासारख्या अद्ययावत तंत्रज्ञानांविषयी मार्गदर्शन करतील. तिसऱ्या दिवशी एक विशेष वर्च्युअल कार्यशाळा मायक्रोसॉफ्ट टीम्स वर आयोजित केली जाईल. या कार्यशाळेत डॉट नेट (.छएढ) तंत्रज्ञान, गिटहब, जनरेटिव्ह एआय आणि सायबर सुरक्षेवर प्रात्यक्षिकांद्वारे माहिती दिली जाईल. सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला प्रत्यक्ष तांत्रिक कौशल्य विकसित करण्याची संधी मिळेल.

याशिवाय, तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख तज्ज्ञांच्या व्याख्यानांमुळे उपस्थितांना डॉट नेट (.छएढ) तंत्रज्ञानाचा व्यावसायिक दृष्टिकोन समजून घेता येईल. आधुनिक सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट तंत्र, कृत्रिम बुद्धिमत्ता, आणि सायबरसुरक्षेच्या क्षेत्रात घडणारे बदल यांची सखोल माहिती येथे दिली जाणार आहे.मायकोसॉफ्ट डॉट नेट कॉन्फरन्स २०२५ ही विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञान क्षेत्राशी जोडले जाण्याची एक अनोखी संधी आहे. ही परिषद केवळ सैद्धांतिक शिक्षण देण्यावर भर न देता, उद्योगातील व्यावसायिकांच्या मार्गदर्शनाखाली व्यावहारिक ज्ञान मिळवून देईल त्यामुळे हि विद्यार्थी आणि तंत्रज्ञानप्रेमींसाठी सुवर्णसंधी असल्याचे मत संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके यांनी व्यक्त केले.

ही परिषद तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वाटचाल करणाऱ्या प्रत्येकासाठी एक प्रेरणादायी आणि शिक्षणदायी अनुभव ठरणार आहे या परिषदेचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानाशी परिचित करून देणे, तसेच त्यांना उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या अनुभवांतून शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे होय. यामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनांना व्यावहारिक स्वरूप देण्यासाठी योग्य मंच उपलब्ध होईल असे प्रतिपादन पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट चे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांनी केले.–

# बारमाही उत्पादनासाठी हे आहे फायदेशीर भाजीपाला पिक; कशी कराल लागवड?

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक –** भेंडी हे निर्यातक्षम पिक आहे. युरोप तसेच आखाती देशात याची निर्यात होते. जागतिक बाजारपेठेच्या मागणीनुसार उत्पादन घेतल्यास याची निर्यात करणे शक्य आहे.

महाराष्ट्रात भेंडीची खरीप व उन्हाळी हंगामात लागवड केली जाते. उन्हाळी हंगामात बहुतांश ठिकाणी पाणी टंचाईमुळे लागवड होत नाही व एकूणच भेंडीची आवक कमी व मागणी जास्त असल्याने चांगला बाजारभाव मिळतो.

**आवश्यक हवामान व जमीन**

भेंडीच्या पिकासाठी उष्ण हवामान हलक्या जमिनीपासून ते काळ्या जमिनीपर्यंत कोणत्याही प्रकारच्या जमिनीमध्ये पुरेसे सेंद्रिय पदार्थ असलेल्या जमिनीत या पिकाची वाढ चांगल्या प्रकारे होते. त्यातून पाण्याचा निचरा होणे आवश्यक असते.

**लागवड कालावधी**

भेंडीची लागवड खरीप हंगामात जून जुलैमध्ये, तर उन्हाळी हंगामात जानेवारी-फेब्रुवारी, तर रब्बी हंगामात ऑक्टोबरमध्ये करावी. बारमाही उत्पादनासाठी

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

भेंडी पीक फायदेशीर असून, टप्प्याटप्प्याने लागवड करता येते.

**विविध जाती**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातर्फे अधिक उत्पादनासाठी भेंडीच्या काही सुधारीत जातींची शिफारस करण्यात आली आहे. त्यामध्ये कोकण भेंडी, परभणी क्रांती, अर्मा अनामिका, अर्का अभय, पंजाब-७, विजया, वर्षा उपहार, परभणी भेंडी, फुले विमुक्ता या सुधारीत जातींची शिफारस केली आहे.




**बीजप्रक्रिया व लागवड**

१ खरिपात हेक्टरी आठ ते दहा किलो बियाणे पुरेसे होते. बी रूजत घालण्यापूर्वी पाण्यात किवा सायकोसीलच्या (१०० मि.ली. प्रतिलिटर) दावणात २४ तास भिजवावे. नंतर बियाणे काढून सावलीत कोरडे करून पेरावे, यामुळे उत्पन्न १० ते १५ टक्के वाढते.

१ कोकणात खरीप हंगामात भेंडीची लागवड ६० बाय ६० सेंटीमीटर अंतरावर करावी.

१ उन्हाळ्यात ४५ बाय १५ सेंटीमीटर अंतरावर करावी, त्यासाठी हेक्टरी २५ ते २० किलो बियाणे वापरावे.

**खत व्यवस्थापन**

भेंडीच्या पिकाला हेक्टरी १५ टन शेणखत, १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, व २५ किलो पालाश द्यावे. लागवडीच्या वेळी संपूर्ण स्फूरद, पालाश व एक तृतीयांश नत्र यांची मात्रा द्यावी. उरलेले दोन तृतीयांश नत्र सम प्रमाणात लागवडीनंतर ३० ते ६० दिवसांनी द्यावे.

आंतरमशागत

दोन ते तीन आठवड्यांनी रोपांची विरळणी करावी. यावेळी खुरपणी करून तण काढावे. साधारणतः दोन ते तीन खुरपण्या कराव्या लागतात. तणनाशकाचा वापर करूनही तणांचे नियंत्रण करता येते. तणनाशकांची फवारणी पेरणीपूर्वी जमिनीत चांगला ओलावा असताना करावी, फवारणीनंतर सात दिवसांनी भेंडीची लागवड कारवी.

**काढणी**

भेंडीची काढणी फळे कोवळी असताना करावी. झाडास फुले येण्यास सुरुवात झाल्यापासून ६ ते ७ दिवसात फळे काढणीसाठी तयार होतात. जातीपरत्वे १०० ते १२० क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. भेंडी या भाजीला बारमाही मागणी आहे.




## सावकाश जेवल्याचे काय आहेत फायदे? जेवण करताना 'या' गोष्टी लक्षात ठेवा

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

जगभरात डाएट एटिकेटस् म्हणजेच भोजन शिष्टाचारांचे पालन केले जाते. आपल्याकडे तर अन्नसंस्कारांची शिकवणूक वर्षानुवर्षे दिली जाते. यामध्ये जेवताना कसे बसावे, जेवणापूर्वी हात धुवावेत यांसारख्या गोष्टी अनेकजण पाळतात. परंतु, नेहमी सावकाश जेवावे आणि अन्न चांगले चावून खावे, हा नियम आजच्या धकाधकीच्या जीवनात दुर्लक्षिला जातो. वास्तविक, सावकाशपणाने अन्नग्रहण करण्याचे अनेक फायदे होतात आणि वैज्ञानिकांनी ते सिद्धही केले आहे. त्यामुळेच सावकाश आणि चावून जेवण्याची सवय आपणही अंगी बाणवली पाहिजे. जेवण चावून खाल्ल्यास पोट लवकर भरते आणि जास्त आहार घेतला जात नाही. सावकाश जेवल्याचे काय फायदे आहेत पाहूया.

वजन कमी होते : भर भर जेवल्यास जेवण नीट पचत नाही आणि चरबी शरीरात जमा होते. त्यामुळे व्यक्ती स्थूल होते. त्यामुळे स्थूलतेपासून बचाव करण्यासाठी आणि वजन संतुलित ठेवण्यासाठी जेवण सावकाश, पण चावून खावे. त्यामुळे कमी कॅलरी पोटात जातील. मेंदूपर्यंत पोट भरल्याचे संकेत जाण्यासाठी २० मिनिटांचा अवधी लागतो त्यामुळे हळूहळू जेवल्यास जास्त जेवण जेवण्याची शक्यता कमी होते.

चांगल्या प्रकारे पचन होते : हळूहळू जेवल्यास जेवण पचते. कारण सावकाश, पण चावून खाल्ल्याने तोंडातील लाळ जेवणात मिसळते. लाळ जेवणात मिसळली गेली तर जेवन पचणे सुलभ जाते. त्यामुळे जेवणातील सर्वच पोषक घटक आपल्याला मिळतात. जेवण जितके चावून सेवन करू तेवढे पचन चांगले होते. तसेच चयापचय क्रियाही चांगली राहते.

**मधुमेहाचा धोका कमी** : सावकाश चावून पदार्थ सेवन केल्यास जेवण चांगले पचते. त्यामुळे मधुमेही व्यक्तींना सावकाश जेवण्याचा सल्ला देण्यात येतो. त्यामुळे ग्लुकोजचे योग्य प्रकारे विघटन होऊन शरीराला ऊर्जा प्राप्त होते.



**पोटाची समस्या दूर** : पदार्थ चावून खाल्ल्यास पोटासंबंधी आजार जसे बद्धकोष्ठता, पोटात वायू होणे आदी विकार होत नाहीत. जर सावकाश चावून जेवण्याची सवय नसेल तर दुपारी किंवा रात्री जेवणात सलाड सेवन करावे. त्यामुळे कच्च्या भाज्या चावून खाण्याची सवय लागते.

**रागापासून मुक्ती** : आरामात सावकाश चावून जेवणाचा आनंद घेत असाल तर लहान लहान गोष्टींचा राग येणे कमी होते. व्यक्तीची चिडचिड कमी होते.

**जेवण करताना लक्षात ठेवा**

जेवणापूर्वी आपले हात साबणाने चांगल्या प्रकारे धुवावे. यामुळे हाताला लागलेले जीवाणू आणि घाण साफ होते.

जेवताना मध्येच पाणी प्यायल्यास पचनक्रियेवर परिणाम होतो. त्यामुळे जेवणापूर्वी अर्धा तास किंवा एक तास आधी आणि नंतर पाणी प्यावे.

जेवण एके ठिकाणी शांत बसून जेवावे. कारण, फिरत फिरत जेवल्यास त्याचा पचनक्रियेवर विपरीत परिणाम होतो.

# १५ जानेवारीपर्यंत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती,**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, शासकीय विभागीय ग्रंथालय, सहायक ग्रंथालय संचालक कार्यालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम शासकीय विभागीय ग्रंथालयात दि. १ जानेवारीपासून सुरू झाला असून दि. १५ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

या उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण, कथन स्पर्धा आणि ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने संदर्भ ग्रंथाचे प्रदर्शन मंगळवार, दि. ३१ डिसेंबर रोजी करण्यात आले. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. डॉ. महेंद्र मेटे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. सहाय्यक ग्रंथालय संचालक राजेश पाटील यांनी प्रास्ताविक केले.गजानन कुरवाडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुरज मडावी यांनी आभार मानले. सदर उपक्रम दि. १५ जानेवारीपर्यंत शासकीय सुटी वगळून चालणार आहे, या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी यांनी केले.

# अमरावती सायकलिंग असोसिएशन आयोजित ६०० किमी बीआरएम, 3 सायकलपटूंनी सुपर रँडोनियरचे विजेतेपद पटकावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–**

अमरावती सायकलिंग असोसिएशनने शनिवार, २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ६:०० वाजता इठच् मालिकेतील ६०० किमी राईडचे आयोजन केले होते. यामध्ये अमरावती येथील सचिन चौधरी, मोहन कावरे, गजानन हिंगे तथा सुधिरकुमार सिंह विनोदसिंग चौहान, या सायकलपटूंनी २००, ३००, ४०० आणि ६०० किमीचे अंतर पूर्ण केले. मालिका पूर्ण केली आणि सुपर रेंडोनियर चे विजेतेपद मिळविले. ६०० किमीचा प्रवास ४० तासात पूर्ण करायचा होता. या रॅलीचे उद्घाटन डॉ.चंद्रशेखर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अमरावती सायकलिंग असोसिएशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा स्टेडियमपासून रॅलीला सुरुवात झाली. या साहसी राईडमध्ये अमरावती ते नागपुर सिवनी व परत नागपुर ते अमरावती जिल्हा स्टेडियम असा मार्ग समाविष्ट करण्यात आला.

संजय मेंडसे आणि राजू धोटे हे या राईडसाठी जबाबदार होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमरावती सायकलिंग असोसिएशनच्या इतर सर्व सदस्यांनी नियोजन केले आहे. स्टार्ट पॉइंट अतुल कलमकर, राजू महाजन, सचिन पारेख, नितिन अंबारे, विनोद वानखडे, सोनी मोटवाणी तथा नितिन बोरगांवकर, और फिनिश पॉइंट ऋषी इंगोले, सुषमा जोशी तथा विजय महल्ले यांनी व्यवस्था केली होती. सर्व रायडर्सचे अमरावती सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.चंद्रशेखर कुलकर्णी व सर्व सदस्यांनी अभिनंदन केले व केक कापून व पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले.





कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५

शहर/ग्रामिण


# कराड अडकला; पण घुले, आंधळे, सांगळे फरार, आता वॉन्टेड घोषित

## स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्याकडून प्रसिद्ध पत्रक जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३बीड–** बीडमधील मस्साजोग येथील सरपंच हत्याकांडाने संपूर्ण राज्याला हादरवून सोडलंय. संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोप अद्याप फरार असल्याने राज्यातील राजकीय वातावरण तापलंय. या हत्याकांडातील आरोपी असलेला वाल्मिक कराड सीआयडीला शरण आलाय, मात्र या प्रकरणातील इतर तीन आरोपी अजून फरार आहेत. पोलिसांनी या तीन आरोपींना फरार घोषित केलंय. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्याकडून यासंदर्भात प्रसिद्धी पत्र जारी करण्यात आले आहे.मस्साजोग येथील माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील सात आरोपींचा हात असल्याचं सांगितलं जात आहे. यातील मास्टरमाईंड असलेला वाल्मिक कराड पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला. मात्र इतर तीन आरोपी अजून फरार आहे. सरपंच हत्येतील आरोपी




सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळेला पोलिसांनी फरार घोषित केलं आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्याकडून प्रसिद्ध पत्रक जारी केले आहे.

वरील फोटोमध्ये असलेले व्यक्ती आरोपी असून त्यांच्यावर खुनासारखा गंभीर गुन्हा दाखल आहे. हत्या झाल्यापासून हे तिन्ही आरोपी फरार आहेत. त्यांना पकडण्याचे शर्तीचे प्रयत्न पोलीस दलाकडून चालू आहेत. या आरोपींविषयी ठाव ठिकाणा कोणास माहिती असेल किंवा फोटोमधील आरोपी दिसून आल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा असं आवाहन करण्यात आलंय.

मागील महिन्याच्या डिसेंबर महिन्यात सरपंच देशमुख यांचे अपहरण करत हत्या झाली होती. याप्रकरणात सात आरोपींचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांनी दिलीय. यातील ३ आरोपींना पोलिसांनी आधीच अटक केलीय. मात्र इतर चार आरोपी फरार होते. हत्येचा मास्टरमाईंड असलेला वाल्मिक कराडचं बीडमधील एका राजकीय नेत्याशी संबंध असल्याने या प्रकरणात राजकीय नेत्यांनी उड्या घेतल्या. या घटनेवरून विरोधकांनी सत्ताधारी पक्षावर टीका केली.

हत्या होऊन २२ दिवस होईपर्यंत गुन्ह्यातील मारेकरी पोलिसांच्या हाती लागत नसल्याने विरोधकांनी सरकारवर हल्लाबोल चढवला. त्यानंतर हे प्रकरण सीआयडीकडे वर्ग करण्यात आला. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी सीआयडीने ९ पथक तयार केली होती. वाल्मिक कराडसह इतर फरार आरोपींचा शोध देशभरात घेतला जात होता. सीआयडीने फरार आरोपींची आणि त्यांच्या नातेवाईकांची बँक खाती गोठवली होती. त्यानंतर सर्व देशभरात त्यांचा शोध घेतला जात होता.

# उद्या अमरावतीत रंगणार वैचारिक दंगल

## माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा शनिवारी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आली आहे. या निमित्ताने अमरावतीमध्ये वैचारिक दंगल बघायला मिळणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन खासदार बळवंत वानखडे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून विधान परिषदेचे आमदार किरण सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारीणी सदस्य हेमंत काळमेघ उपस्थित राहतील.राजकीय स्वार्थासाठी दिल्या जाणाऱ्या योजना लोकशाहीस घातक आहे, या विषयावर ही स्पर्धा रंगणार आहे. ४ जानेवारीला सकाळी १०.३० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या सभागृहात



स्पर्धेला प्रारंभ होईल.

या स्पर्धेचे फेसबुक, युट्यूबच्या माध्यमातून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. स्पर्धेत विजेता संघाला स्व. माणिकराव घवळे स्मृती फिरता चषक प्रदान करण्यात येईल. विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल बाजूस मते मांडणाऱ्या दोन स्पर्धाचा संघ स्पर्धेसाठी पात्र ठरेल. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या संघाला ११००१ रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र आणि फिरता चषक देऊन गौरविण्यात येईल. वैयक्तिक गटात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्याला ७००१ रुपये रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक ५००१ रुपये रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय पुरस्कार ३००१ रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तर प्रोत्साहनपर पारितोषिक म्हणून २००१ रुपये रोख व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.या स्पर्धेचे हे २३ वे वर्ष असून, स्पर्धेच्या माध्यमातून महत्वपूर्ण विषयावर मत मांडण्याची संधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्राप्त होणार आहे. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील नावाजलेले वादविवादपटू या स्पर्धेचे परीक्षण करणार आहेत. ही स्पर्धा निःशुल्क असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, संयोजक प्रफुल्ल घवळे व आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. माहितीकरीता डॉ. शीतलबाबू तायडे, ९८२२५२७८०८, डॉ. अमित गावंडे ९४२२९४३२९८, प्रा. रणजित देशमुख ९९७५७७८१८, मयुर चौधरी ७७९८०६०५००, रत्नाकर शिरसाट ८८५७९११०३६ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केलेले आहे.

# देशात केवळ ५७.२ टक्के शाळांमधील कॉम्प्युटर हे चालू स्थितीत

## रिपोर्टमधून काही धक्कादायक माहिती आली समोर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३नवी दिल्ली –** देशातील शाळांची सद्यस्थिती काय आहे. याबाबत केंद्र सरकारने एक रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे. या रिपोर्टमधून काही धक्कादायक माहिती समोर आली आहे. स्वत:ला हायटेक म्हणवणाऱ्या बहुतांश शाळांचे दावे हे केवळ दिखावा असल्याचे या रिपोर्टमधून उघड झालं आहे. देशात अनेक शाळा अशा आहेत, जिथे कॉम्प्युटर बंद स्थितीत आहेत. त्याशिवाय देशात अर्ध्याहून अधिक अशा शाळा आहेत. जिथे संगणक तर आहेत. पण इंटरनेटची सुविधा नाही आहे.




केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून शाळांच्या व्यवस्थापनाबाबत जे आकडे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यामधील माहिती धक्कादायक आहे. युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन प्लस च्या आकडेवारीनुसार देशात केवळ ५७.२ टक्के शाळांमधील कॉम्प्युटर हे चालू स्थितीत आहेत. त्याचप्रमाणे देशातील केवळ ५३.९ टक्के शाळांमध्येच इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे देशातील केवळ ५२.३ टक्के शाळांमध्येच रेलिंग असलेले रॅम्प आहेत.

तसेच शाळांधील प्रवेशांचा विचार करायचा झाल्यास देशातील शाळांमध्ये प्रवेश घेण्याच्या प्रमाणात घसरण झाली आहे. २०२३-२४ मध्ये मागच्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ३७ लाख कमी प्रवेश नोंदवले गेले आहेत. आकडेवारीनुसार २०२२-२३ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २५.१७ कोटी होती. तर २०२३-२४ मध्ये हा आकडा २४.८० कोटींवर आला आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १६ लाखांनी घटली आहे. तर विद्यार्थिनींची संख्या ही २१ लाखांनी घटली आहे.

# थर्टी फर्स्ट'ला नियम मोडला ४४६ वाहन चालकांना दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** नववर्षाच्या पूर्वसंध्येपासूर अमरावती शहर पोलिसांनी शहरातील विविध ठिकाणी नाकाबंदी करून नियमबाह्य वाहन चालवणाऱ्या ४४६ चालकांवर कारवाईचा बडगा उगारला. यामध्ये वाहतूक पोलिसांनी ३ लाख ९६ हजार ८०० रुपयांचा दंड संबंधित चालकाविरुद्ध ठोठावला आहे.शहर पोलिसांकडून थर्टी फर्स्टसाठी तगडा बंदोबस्त ठेवला होता. दरम्यान अपघात किंवा कोणतीही अप्रिय घटना घडू नये, या दृष्टीने पोलिस कार्यरत होते. यावेळी वाहतूक विभागाचे सहायक पोलिस आयुक्त संजय खताळे, वाहतूक शाखेच्या पोलिस निरीक्षक रिता उईके



व पोलिस निरीक्षक ज्योती विल्लेकर यांनी शहरात रस्ते सुरक्षा अबाधित राखून अपघात टाळणे तसेच मोटर वाहन कायद्याचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध कारवाईसाठी बहुतांश पॉइंटवर पोलिस तैनात केले होते. या मोहिमेदरम्यान अपघातास कारणीभूत घटक या सदराखाली दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या १२ जणांविरुद्ध कारवाई केली आहे. भरधाव वेगाने वाहन चालवणाऱ्या ११ जणांविरुद्ध, वाहन चालवताना मोबाइल फोनवर बोलणे ३४, वाहतूक सिग्नल तोडणे- ३४, ट्रिपल सिट वाहन चालवणे-९८, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहून नेणे-५, नो एन्ट्रीमध्ये प्रवेश करणे-४, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल असे वाहन पार्क करणे-२५ तसेच विना हेलमेट-१५, विना सिटबेल्ट-८, विना इन्शुरन्स-२, वाहन परवाना सोबत न बाळगणे-९६, फॅन्सी नंबर प्लेट-२८ यासह अन्य ४ वाहन चालकांविरुद्ध मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करून ३,९६,८०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

# अवैध ऑनलाइन लॉटरी जुगार; ५ जणांवर कारवाई

## वरुड येथे स्थानिक गुन्हे शाखेने केली कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ शेंदुरजनाघाट–** नगरपालिका कॉम्प्लेक्स क्रूड परिसरात अवैध ऑनलाइन लॉटरी जुगार चालवणाऱ्या ५ जणांविरुद्ध विरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आहे.

काही दिवसांपासून भारत लॉटरी सेंटर या नावाने व्यवसाय सुरू होता. परंतु, हे लॉटरी सेंटर अवैध असल्याची कुणकुण स्थानिक गुन्हे शाखेला लागल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १ जानेवारीला सायंकाळी या लॉटरी सेंटरवर धाड टाकली. या वेळी लॉटरी सेंटरवर असलेल्या मनीष ठाकरे (३२) रा. एकदरा, भारतडहाके (३२) रा. सावता चौक क्रुड, राजा ठाकूर (५१), दिनेश उईके (३५) दोन्ही रा. मिरची प्लॉट क्रूड, अमोल बनईत (४८) रा. वाठोडा यांच्याविरोधात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली. या प्रकरणी आरोपींकडून ६५ हजार १०० रुपये किमतीचे ऑनलाइन जुगाराचे साहित्य व नगदी १३ हजार ७२० रुपये असा एकूण ७८ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई स्थागुशाचे पीएसआय सागर हटवार, बळवंत दाभणे, रवींद्र बावणे, भूषण पेठे, पंकज फाटे, चालक विलास रावते यांनी केली.

# युवतीला ब्लॅकमेल करणाऱ्या युवकाला बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांचा चोप

## चांदूरबाजार शहरात काही काळ तणावाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३चांदुर बाजार** एका महाविद्यालयीन युवतीशी प्रेमसंबंध प्रस्थापित करून तिचे अश्लिल फोटो काढत तिला ब्लॅकमेल करणाऱ्या युवकाला पकडून बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी त्या युवकाला पकडून चांगलाच धडा शिकविला. त्यानंतर त्याला चांदूरबाजार पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. दरम्यान चांदूरबाजार शहरात काही काळ तनावाचे वातावरण निर्माण झाले होते.

एका महाविद्यालयीन युवतीला एका युवकाने आपल्या विमजाळ्यात ओढले. त्यानंतर तिचे अश्लिल व्हिडिओ तयार करून ते व्हायरल केले. यानंतर तिला ब्लॅकमेल करणे सुरू केले. हा प्रकार युवतीने चांदूरबाजार शहरातील बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना सांगितला. त्यानंतर या कार्यकर्त्यांना युवतीला ब्लॅकमेल करणाऱ्या युवकाला पकडून चांगलाच धडा शिकविला व पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. पोलिसांनी युवतीच्या तक्रारी



वरून युवकाविरूध्द विविध कलमा न्वये गुन्हा दाखल केला आहे. चांदूर बाजार जुनी पंचायत समिती समोरील गीताई कॉम्प्लेक्समधील सेंट्रल बँकेच्यावर कॉम्प्लेक्स मालक काही वेळा करीता आपल्या रूम भाड्याने देतो, अशी माहिती यानिमित्ताने पुढे आली.

# दर्यापुरात सीसीआयतर्फे कापूस खरेदीला सुरुवात

## जिनिंग निवडण्याची शेतकऱ्यांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३दर्यापूर**तालुक्यातील सीसीआयच्या कापूस खरेदी केंद्रावर कापूस खरेदीला सुरुवात झाली असून शेतकऱ्यांना आता शेतकऱ्यांना हवा त्या जीनमध्ये कापूस विक्रीची मुभा देण्यात आली आहे.

तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कापूस विक्री करण्याचे आवाहन जिनिंग संचालकांच्या वतीने करण्यात आले आहे. सदुरु जिनिंग दहीहंडा रोड, जय गजानन कॉटन, श्री बालाजी जिनिंग, मंगल बाबा जिनिंग, खंडेलवाल जिनिंग, समर्थ जिनिंग, टोळे पाटील जिनिंग, टोळे पाटील इंडस्ट्रीज, पद्मावती जिनिंग, व्ही.पी. कोटेक्स या जिनिंग केंद्रावर सीसीआय मार्फत खरेदी सुरू आहे. येथे



शेतकऱ्यांनी कापूस विक्रीला आणावा, असे आवाहन दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील गावंडे यांनी केले आहे.

# निराधार, श्रावणबाळ लाभार्थ्यांनी कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ अनुदान योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे अनुदान डीबीटी प्रणालीमार्फत आता थेट बॅक खात्यात जमा होणार आहे. यासाठी लाभार्थ्यांनी कागत्रपत्रे सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.याबाबत तहसिलदार (संगायो) कार्यालयातर्फे कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र अनेक लाभार्थ्यांनी कागदपत्रे जमा केली नाहीत. लाभार्थ्यांनी डीबीटी प्रणालीकरिता आवश्यक कागदपत्रे सादर केली नसल्यास लाभार्थ्यांना अनुदानापासून वंचित रहावे लागेल, असे तहसिलदार, अमरावती यांनी कळविले आहे.

# अडगावची जि.प. शाळा पूर्ववत

## दोषींवर दोन दिवसांत कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** मोशी तालुक्यातील अडगावच्या जि.प. प्राथमिक शाळेतील मध्यान्ह भोजनातून विषबाधा प्रकरणाला कारणीभूत असलेल्यांनी - 'कारणे दाखवा' नोटीस पाठवली होती. त्यांनी उत्तरे सादर केली आहेत. त्या अनुषंगाने शिक्षणाधिकाऱ्यांनी (प्राथमिक) आपला अहवाल तयार करणे सुरू केले असून, दोन दिवसांत जबाबदार कर्मचाऱ्यांवरील कारवाई - निश्चित केली जाणार आहे. दरम्यान शाळा - पूर्ववत भरणे सुरू झाले असून, विद्यार्थ्यांना शेजारच्या शाळेतून शालेय पोषण आहार दिला जात आहे.

चार दिवसांपूर्वी अडगाव येथील ३२ विद्यार्थ्यांना भजनातून विषबाधा झाली होती. - त्यापैकी गंभीर असलेल्या १८ जणांना जिल्हा - सामान्य रुग्णालयात हलवले होते. सध्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याच्या बाहेर असून, त्यांना सोईनुसार सुटी दिली जात असल्याचे रुग्णालयीन सूत्रांनी सांगितले आहे. विद्यार्थ्यांना दुपारी दिली जाणारी खिचडी आणि मटकीची उसळ शिळ्या व कालबाह्य अन्न-पदार्थांपासून तयार केल्याने ही घटना घडल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले होते. त्यामुळे मोशीचे गटशिक्षणाधिकारी गुणवंत वरघट, शालेय पोषण आहार योजनेचे अधीक्षक प्रज्ञा बहुरे, मुख्याध्यापक दिनेश भागवत आणि स्वयंपाकी व मदतनीस अशा पाच जणांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अरविंद मोहिरे यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली होती. या सर्वांनी उत्तरे सादर केली असून, त्याआधारे शिक्षणाधिकारी आपला अहवाल तयार करत आहेत. सीईओंशी सल्लामसलत केल्यानंतर तयार केल्या जाणाऱ्या या अहवालानंतर ते स्वतःच जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाईचा आदेशही जारी करतील. त्यासाठी एक-दोन दिवस लागू शकतात, अशी माहिती आहे.

# महानगरपालिका अधिक सक्षम व विकसित करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वय साधावा - आ. सौ.सुलभाताई खोडके

## महापालिका अधिनस्त विविध विकास कामे व योजनांचा आमदार महोदयांनी घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती–**

अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणारी अमरावती महानगरपालिका ही अत्यंत महत्वाची स्थानिक स्वराज्य संस्था आहे. शहरी भागाच्या विकासासाठी व योजनांचा अंमलबजावणीचे मोठे दायीत्व महानगरपालिकेला पार पाडावे लागते. दिवसेंदिवस वाढते शहरीकरण लक्षात घेता नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे अमरावती शहर हे आपले घर ही भावना सर्वांनी मनीबाळगून शहराला नवा आयाम व लौकीक मिळवून देण्यासाठी सामुहीक प्रयत्नांची गरज असून सर्व यंत्रनांनी संवाद व समन्वय साधून अमरावती महानगरपालिका क्षेत्रात सुखसुविधा निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी केले.



आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी महापालिकेच्या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहमध्ये बैठक घेवून विविध विभागांच्या कामाचा व सद्यास्थितीच्या आढावा घेतला.

सर्व प्रथम मा.आमदार महोदया यांचे मा. आयुक्त यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. त्यानंतर आयुक्त यांनी महानगरपालिकेतील सर्व विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनेबाबत माहिती दिली. मा. आमदार महोदया यांनी प्रत्येक विभागात चालणारे कामाचे कार्यपध्दती बाबत माहिती घेवुन काही विषयावर उपस्थित नागरीकांसह संबंधीत अधिकारी यांचे सोबत चर्चा करुन नागरीकांच्या समस्यांचे निराकरण करणेबाबत सुचना दिल्यात.बांधकाम विभाग, शिक्षण विभाग, नगर रचना विभाग, टॅक्स विभाग, अतिक्रमण विभाग, उद्यान विभाग, प्रकाश विभाग, पशुवैद्यकीय विभाग, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच शिवटेकडी (मालटेकडी) व वडाळी तलाव-उद्यान, शहरातील साफ सफाई व कचरा उचलणेबाबत तसेच आरोग्य विभागाशी संबंधीत कामाबाबत नागरीकांच्या समस्यावर चर्चा करुन संबंधीतांना निर्देश देण्यात आले. अमरावती महानगरपालिकेच्या वतीने सुरु असलेली मालमत्ता कर वसुली अधिक सुलभ करणे, तांत्रिक बाबीमुळे काही अडचणी निर्माण झाले असतील तर त्याची दुरुस्ती करुन मालमत्ता धारकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात यावे. शासनाच्या आदेशानुसार ठरवून दिलेल्या निर्देशाप्रमाणे मोहीम राबवून सर्वसामान्य नागरिकांना गैरसोय होणार नाही याकरीता संबंधीतांनी सर्व प्रकीया सुरळीतपणे पार पाडण्याची सुचना आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली.

या बैठकीत आमदार सौ.सुलभाताई खोडके यांच्या समवेत मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपआयुक्त डॉ.मेघना वासनकर, उपआयुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, मनपा झोनस्तरीय अधिकारी, विभागप्रमुख तसेच सर्व सहकारी उपस्थित होते.

# नागपुरात टोळीयुद्ध पेटले, अंधाधुंद गोळीबारात कुख्यात गुंडाची हत्त्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नागपूर : नागपुरात** नवीन वर्षात टोळीयुद्धाने तोंड वर काढले असून भरदिवसा एकाची गोळ्या घालून हत्त्या करण्यात आली. शेखू टोळी आणि हिरणवार टोळीमधील वैमनस्यातून ही घटना घडली. शेखू टोळीच्या सदस्यांनी कारने जाणा-या हिरणवार टोळीतील सदस्यांचा पाठलाग करून खापरखेड्या जवळ कारवर अंधाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात पवन हिरणवार यांच्या पाठीत गोळ्या लागल्याने जागीच मृत्यू झाला तर त्याचा भाऊ बंटी हिरणवार आणि एक अन्य साथीदार गंभीर जखमी झाला. एखाद्या चित्रपटाला शोभेल अशी घटना गुरुवारी सायंकाळी चार वाजता घडली.गोळीबार केल्यानंतर शेखू टोळी लगेच पळून गेली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षापासून शेखू टोळी आणि पवन हिरणवार टोळीत वाद आहे. हिरणवार टोळीने शेखूच्या लहान भावाचा भरचौकात खून केला होता. त्यामुळे शेखूला हिरणवार बंधूचा 'गेम' करायचा होता. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून ते हिरणवार बंधू एकांतात केव्हा असतील, याची वाट बघत होते. पवन हिरणवार-बंटी हिरणवार हे दोघेही तीन साथिदारांसह गुरुवारी दुपारी बाभुळखेड्यातील पंचमुखी हनुमानाच्या दर्शनासाठी गेले होते. पवन आणि बंटी एकाच कारमध्ये असल्याची माहिती शेखूला मिळाली. शेखू हा आपल्या पाच साथीदारासह तीन दुचाकींनी पवनच्या मागावर निघाला. तर शेखू हल्ला करणार याबाबत अनभिज्ञ असलेला पवन हा देवदर्शन करुन कारने सुसाट परत येत होता.

खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोनखैरी रस्त्यावर शेखूच्या टोळीने पवनच्या कारचा पाठलाग करणे सुरु केले. पवनची कार दिसताच शेखूच्या टोळीने पवनच्या कारवर अंधाधुंद गोळीबार करणे सुरु केले. दोन दुचाकीचालकांनी कारच्या मधोमध दुचाकी घालून पवन हिरणवारवर गोळ्या झाडल्या. यात पाठीत गोळ्या लागल्याने पवनचा जागीच मृत्यू झाला तर चालकाच्या शेजारी बसलेल्या बंटीवरही आरोपींनी गोळीबार केला. मात्र, त्यात बंटी थोडक्यात हुकला. गोळीबार होत असल्यामुळे चालकाने कार थांबवली. आरोपींनी चाकूनेही एका युवकावर हल्ला केला. तर कारमधील दोन युवकांनी शेखू टोळीवर प्रतिहल्ला केला. त्यामुळे शेखूने पळ काढला. झटापटीत शेखूच्या हातातील पिस्तूल घटनास्थळावर पडली. या प्रकरणी खापरखेडा पोलिसांनी हत्याकांडाचा गुन्हा दाखल केला असून आरोपींच्या शोधासाठी



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जंगलात फिरत आहे. टीप दिल्यानंतर केला हल्ला शहरातील गुन्हेगारांच्या काही टोळ्यावर राजकीय वरदहस्त आहे. शेखू आणि हिरणवार टोळीचेही राजकीय 'कनेक्शन' आहे. शेखूला हिरणवार टोळीतील एका सदस्याने पवन आणि बंटीची टीप दिली. त्यामुळेच शेखूने साथीदारासह हिरणवारच्या कारचा पाठलाग केला, अशी माहिती आहे. या घटनेमुळे शहरात पुन्हा टोळीयुद्ध पेटण्याची चिन्हे आहेत.

# 'त्या' कापूस बियाण्यांना मान्यता द्या

## केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ यवतमाळ :**

तणनाशक सहनशील व कीड प्रतिरोधक कापसाच्या एचटीबीटी बियाणे लागवडीस अनुमती देण्यात यावी. अशी मागणी खासदार संजय देशमुख यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्याकडे केली आहे.



तणामुळे पिकांच्या उत्पादकतेचे मोठे नुकसान होते. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या अहवालामध्ये त्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तणामुळे कापसाचे उत्पादन ६० टक्क्यांपर्यंत घटते. सोयाबीन १० ते १०० टक्के नुकसानीचा सामना करतो. धानाचे १० ते १०० टक्के, तूर २० ते ३० टक्के, ऊस २५ ते ५० टक्के, गहू १० ते ६० टक्के नुकसान होते. यामुळे तणनाशक सहन करणार्या एचटीबीटी वाणाला मंजुरी देण्यात यावी अशी मागणी खासदार संजय देशमुख यांनी केली आहे.कापसाच्या क्षेत्रीय चाचण्या आणि सामाजिक, आर्थिक अभ्यासाचा निष्कर्षानुसार एचटीबीटीचे तण व्यवस्थापन पर्यावरणपूरक असल्याचा निर्वाळा या पत्रात देण्यात आला. दरम्यान २००८, २००९ आणि २०१२ लाएचटीबीटीच्या चाचण्या झाल्या. या चाचण्यांमधून हे वाण योग्य असल्याचे अधोरेखित झाले आहे. नामांकित कंपन्यांच्या चाचण्यातून ही बाब स्पष्ट झाली. यानंतरही या वाणाला परवानगी मिळाली नाही. यामुळे या कापसाच्या वाणाला खासदारांनी परवानगी मागितली आहे. सरकार हा विषय किती गांभीर्याने घेते यावर या वाणाची मंजुरी अवलंबून असणार आहे.

### कायद्याची प्रक्रिया जटिल, वेळकाढू

जगात जनुकीय अभियांत्रिकी विज्ञानात संशोधन जलदगतीने होत आहे. भारतीय आनुवंशिकरित्या सुधारित पिकासंदर्भातील जनुकीय अभियांत्रिकी विज्ञानाचे कायदे क्लिष्ट व वेळकाढू आहेत. त्यामुळे शेतकरी आणि शेतमाल प्रक्रिया उद्योग स्पर्धेत टिकू शकत नाही. असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

# आंगण' एक्झिबिशनः अमरावतीकरांना गृहसजावटीसाठी अनोखी संधी!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती–** रंगोली लॉन, काठोरा नाका अमरावती येथे ६, ७ आणि ८ जानेवारी २०२५ रोजी भव्य 'आंगण' एक्झिबिशन आयोजित करण्यात आले आहे. ही प्रदर्शनी सर्वांसाठी पूर्णपणे मोफत असून आपल्या आवडत्या वस्तू खरेदी करण्यासाठी आणि नव्या कलाकृतींचा आनंद घेण्याची ही योग्य संधी आहे. या प्रदर्षणीमध्ये अनेक नाविन्यपूर्ण स्टॉल लावण्यात येणार आहे, ज्यामध्ये तुम्हाला हातमागाच्या पारंपरिक वस्त्रांपासून आधुनिक गृहसजावटीच्या वस्तूंपर्यंत सर्व काही पहावयास मिळेल. याशिवाय कॉस्मेटिक उत्पादने, हस्त कौशल्याच्या विविध कलाकृती,गृह उद्योगातील उत्पादने, तसेच पारंपारिक आणि आधुनिक उपयुक्त वस्तू पाहायला मिळतील. संक्रांतीच्या उत्सवात घराची नवीन सजावट करण्यासाठी विविध वाण -वस्तू मिळण्याची अमरावतीतील नागरिकांसाठी ही सुवर्णसंधी आहे !, ज्यामध्ये तुम्ही आपल्या घराचे सौंदर्य वाढवण्यासाठी विविध कल्पक वस्तूंची खरेदी करू शकता. प्रदर्शनीचे विशेष आकर्षण म्हणजे प्रदर्शनाला भेट देणार्या प्रत्येक सदस्याला कूपन देण्यात येणार आहेत, ज्याचा लाभ तुम्ही विविध स्वरूपात घेऊ शकता.तर मग, चला ! 'आंगण' एक्झिबिशनला भेट द्या आणि गृह सजावटीला एक नवा आयाम द्या. आपल्या मित्र-परिवारासोबत या प्रदर्शनाचा आनंद लुटा!तारीखः ६, ७, ८ जानेवारी २०२५ स्थळ: रंगोली लॉन,काठोरा नाका, अमरावतीप्रवेश: मोफत ,लक्षात ठेवा अशी संधी वारंवार येत नाही! या प्रदर्शनीचे आयोजन प्रा. निकिता उमक यांनी केले असून भ्रमणध्वनी क्रमांक ७५०७३७४५७५ हा आहे, अधिक माहितीकरिता संपर्क करावा.

# गो. से महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमाचे उद्घाटन संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३खामगाव:–** विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालय इमारतीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक १ जानेवारी २०२४ बुधवार रोजी संपन्न झाले. वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा हा १५ दिवसांचा कार्यक्रम आहे. आज गो. से. महाविद्यालयाने वाचनासंबंधी विविध उपक्रमांचे आयोजन करून या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर सर, इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ पृथ्वीराज ठाकूर आणि सदर उपक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. दीपक नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये समन्वयक प्रा. दीपक नागरिक यांनी वाचन ही केवळ सवय नसून जीवन जगण्याचा अधिकार असल्याचे प्रतिपादित केले.

प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले आजच्या डिजिटल युगात, जरी आपल्यासमोर अनेक साधने उपलब्ध असली, तरी त्याचबरोबर मोबाईल फोन आणि इंटरनेटमुळे आपले वेळेचे वाटप पूर्णपणे बदलले आहे. विद्यार्थ्यांना सतत मोबाईल फोन वापरण्याची आवड लागली आहे. यामुळे वाचनाची आवड कमी होत आहे, आणि पुस्तकांच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष होत आहे. मोबाईल आणि इंटरनेटचा योग्य वापर आवश्यक असला तरी, त्यात तासांनी व्यस्त होणे, वाचनाची सवय कमी करणे, हे आपल्या भविष्यासाठी हानिकारक ठरू शकते. वाचन हे केवळ ज्ञान प्राप्त करण्याचे साधन नाही, तर ते आपल्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारशक्तीचा आणि जीवनाची समज वाढविण्याचे एक उत्तम साधन आहे. पुस्तकांमध्ये असलेल्या विविध प्रकारच्या माहितीमुळे आपल्याला जगाच्या विविध क्षेत्रांबद्दल अधिक विचार करण्याची क्षमता मिळते. वाचनामुळे आपली शब्दसंपत्ती वाढते, विचारप्रवृत्तीस चालना मिळते, आणि समाजातील विविध मुद्द्यांवर आपली दृष्टी अधिक विस्तृत होईल असे त्यांनी शेवटी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एच. डी. आकोटकर यांनी केले. प्रा. डॉ. पृथ्वीराज ठाकूर यांनी मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा गोषवारा घेत उपस्थितांचे आभार मानले. यावेळी सभागृहातील प्रत्येक विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांनी त्यांच्या सोयीनुसार वेगवेगळी पुस्तके वाचली व कृती कार्यक्रमामधून सदर उपक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. जी. बी. काळे, प्रा. डॉ. पी. ई. अजमिरे, प्रा. डॉ. व्ही. एस. अथवार, प्रा. डॉ. एम. एस. गायकवाड, प्रा. डॉ. डी. टी. अढाऊ, प्रा. विक्रम मोरे, तसेच सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठे संख्येने उपस्थित होते.



सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. डी. एम. नागरिक (समन्वयक), समितीचे सदस्य प्रा. डॉ. एच. डी. आकोटकर, प्रा. सौ. एस. जी. वायचाळ, प्रा. डॉ. जे. डी. पोरे, प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख, प्रा. डॉ. पी. पी. ठाकूर, प्रा. डॉ. एस. एन. खडसे, प्रा. डॉ. एन. बी. बोचे, श्री. एस. जी. गुळभेले, या लोकांनी मेहनत घेतली. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# भुषण यावले यांची पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ तिवसा –** भुषण रामचंद्रजी यावले यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष (अमरावती ग्रामीण)पदी निवड करण्यात आली आहे.भुषण यावले यांनी गेल्या पंचवीस वर्षांपासून पत्रकारितेच्या माध्यमातून वंचित,पिडीत,व अन्यायग्रस्त, गोरगरीब नागरिकांना आपल्या लेखणीतून न्याय देण्यासाठी लढा उभारला.एवढेच नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तथा औद्योगिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.व अल्पावधीतच युवा उद्योजक म्हणून नावारूपास आले.तसेच शहरातील सामाजिक कार्यात सदैव अग्रस्थानी राहुन आपल्या मा अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे तिवसा तालुका अध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वी जबाबदारी पार पाडली.त्यामुळे अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे केन्द्रीय अध्यक्ष मनोहर सुने व कार्यकारिणीने त्यांचेवर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली आहे.त्यांच्या निवडीबद्दल केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, महासचिव सुरेश सवळे, प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख , महाराष्ट्र महिला अध्यक्ष जयश्री पंडागरे ,अशोक पवार, राजेंद्र भुरे, बाळासाहेब सोरगिवकर, बाळासाहेब खडसे तसेच केंद्रीय व प्रदेश कार्यकारणी पदाधिका र्यांकडूनसमाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

## उद्यापासून पुण्यतिथी महोत्सवाला होणार प्रारंभसंगीतमय भागवत कथेचे आयोजन,भाविकांमध्ये उत्साह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३नांदगाव पेठ–** संत काशिनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला उद्यापासून (४ जानेवारी) प्रारंभ होणार आहे. एक महिन्यांपासून सुरू असलेली पुण्यतिथी महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात असून संत काशीनाथ महाराज यांच्या मंदिरावर तसेच मंदिर परिसर व छत्रपती शिवाजी महाराज चौकात आकर्षक रोषणाई देखील करण्यात आलेली आहे.नाफडे पेट्रोल पंप नजीक असलेल्या संत काशिनाथ धाम याठिकाणी अतिशय उत्साहात व धार्मिक वातावरणात पुण्यतिथी महोत्सव साजरा होणार आहे. विदर्भासह राज्यात असलेल्या भाविक भक्तांची या पुण्यतिथी महोत्सवादरम्यान दर्शनासाठी रीघ लागणार आहे.हजारो भाविक या पुण्यतिथी महोत्सवात सामील होणार आहे.सप्ताहामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. हभप श्री. सोपान महाराज काळबांडे (आळंदीकर) यांच्या यांच्या सुमधुर वाणीतील संगीतमय भागवत कथेचे भाविकांसाठी आयोजन करण्यात आले आहे.संत काशिनाथ महाराज विश्वस्त संस्था तसेच गावकरी मंडळी महोत्सवाच्या आयोजनासाठी अविरत परिश्रम घेत आहेत. पुण्यतिथी महोत्सवाचे हे १९ वे वर्ष आहे दैनंदिन कार्यक्रमात सकाळी साडे पाच वाजता काकड आरती, सकाळी ८ वाजता बाबांची पूजा व आरती,सकाळी ८:३० ते ११:३० श्री. ज्ञानेश्वरी पारायण,दुपारी १ ते ५ दरम्यान हभप सोपान महाराज आळंदीकर यांच्या सुमधुर वाणीतील संगीतमय भागवत कथेचे भाविकांसाठी आयोजन करण्यात येणार आहे.सायंकाळी हरिपाठ आणि



सामुदायिक प्रार्थना व त्यानंतर रात्री हरिकीर्तन होईल. दररोज रात्री ८:३० वाजता हभप श्री निवृत्ती बुवा फाळके, हभप सौ. रुपालीताई सवणे,हभप श्री नारायण महाराज शिंदे,हभप श्री सोपान महाराज सानप शास्त्री,हभप श्री संतोष महाराज जाधव,हभप श्री शिवाजी महाराज झामरे पाटील,हभप श्री रमेश महाराज दुधे यांचे नियोजित हरिकर्तन होणार आहे. ११ जानेवारी रोजी पुण्यतिथी महोत्सवाचा समारोप असून दुपारी १२ ते ५ दरम्यान महाप्रसाद वितरित करण्यात येणार आहे. तरी भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वर्धा नदीच्या काठावर मौर्यकालीन अवशेष



विदर्भ प्रजासत्ताक
दि.३चंद्रपूर

जिल्ह्यातील वर्धा नदीच्या काठावर असलेल्या शेतात मौर्य ते सातवाहन काळखंडातील अवशेष सापडत आहेत. त्यात टेराकोटाचे मणी, घरगुती वापरातील भांड्यांचे तुकडे, दगडी हत्यार, तांब्याच्या मूर्ती आदींचा समावेश आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातून वैनगंगा, वर्धा, अंधारी, उमा, पैनगंगा नद्या वाहतात. प्राचीन काळात नदी काठावर वस्त्या असायच्या. या वस्त्यांचे अवशेष आजही सापडते. गोंडपिपरी तालुक्यात येणाऱ्या वेडगाव शेतशिवारात वर्धा नदीच्या काठावरील वसंता चिताडे यांच्या शेतात प्राचीन वस्तीचे अवशेष सापडले आहेत. ते वाकाटक काळातील असण्याचा अंदाज अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी व्यक्त केला आहे. नदीचा दुसऱ्या काठावर तेलंगणा राज्यातील गावे आहेत. प्राचीन काळात नदी मार्गाने वाहतूक केली जायची. त्यामुळे येथे नाका असावा अशी शक्यता चोपणे यांनी वर्तविली आहे.

गोंडपिपरी तालुक्यातील गावागावात ऐतिहासिक वस्तू सापडतात. वेडगाव येथे सापडत असलेल्या वस्तू गोंडपिपरी तालुक्यातील इतिहासात भर टाकणाऱ्या आहेत. या रिठाचे उत्खनन पुरातत्व विभागाने करावे, अशी मागणी ऐतिहासिक वारसा संवर्धन समितीचे अध्यक्ष अरुण झगडकर यांनी केली.

# न्यू तापडिया नगरकडे जाणाऱ्या मार्गावरील फाटक रेल्वे मार्गाची देखभाल व दुरुस्तीसाठी आठ दिवस बंद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३ अकोला

शहरातील न्यू तापडिया नगरकडे जाणाऱ्या मार्गावरील फाटक रेल्वे मार्गाची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी आठ दिवस बंद ठेवण्यात आले. त्यामुळे हजारो नागरिकांना मनस्तापाचा सामना करावा लागत आहे. मोठा फेरा घेऊन नागरिकांना शहर गाठावे लागते. मध्य रेल्वेच्या आडमुठ्या धोरणामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे.

मध्य रेल्वे मार्गावरील फाटक क्र. ३८ ए हे १ जानेवारीला सकाळी ६ वाजतापासून रेल्वे मार्गाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी बंद केले. हे फाटक ८ जानेवारीला रात्री ८ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद राहील. मध्य रेल्वेने तब्बल आठ दिवस रेल्वे फाटक बंद ठेऊन परिसरातील नागरिकांना चांगलेच वेठीस धरले आहे.




आतापर्यंत मध्य रेल्वेकडून मार्गाची देखभाल व दुरुस्तीचे कार्य रात्रीच्या सुमारास वाहतूक बंद ठेऊन केले जात होते. या वेळेस प्रथमच संपूर्ण आठ दिवस २४ तास वाहतूक बंद केली. याठिकाणी दिवसा रेल्वे मार्गाचे काम सुरू ठेऊन रात्री ते बंद ठेवण्यात येते. वास्तविक रात्री काम करून दिवसा फाटक वाहतुकीसाठी सुरू ठेवता आले असते. मात्र, मध्य रेल्वेने नागरिकांच्या गैरसोयीचा विचार न करता थेट आठ दिवसांसाठी रेल्वे फाटक बंद ठेवण्याचा मनमानी निर्णय घेतला.

जठारपेठमधून न्यू तापडिया नगरकडे जाणारा हा अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे. न्यू तापडिया नगर, पंचशील नगर, खरप बु. आदी परिसरासह विविध गावांना अकोला शहराशी जोडणारा हा मार्ग असून रेल्वे फाटक बंद असल्यामुळे या भागातील नागरिकांची अत्यंत अडचण होत आहे. देखभाल व दुरुस्तीसाठी फाटक बंद करण्यापूर्वी रेल्वेने वाहतुकीसाठी पर्यायी व्यवस्था केली नाही. त्यामुळे न्यू तापडिया नगर भागातील नागरिकांना पंचशील नगर, आपातापा मार्ग, अकोट फैल मार्गे शहर गाठावे लागते. हा खडतर मार्ग अनेक कि.मी. दुरवरून जात असल्याने नागरिकांना शारीरिक व मानसिक त्रासासह आर्थिक नुकसान देखील सहन करावे लागते. शाळकरी विद्यार्थ्यांना चांगलीच तारेवरची कसरत करावी लागत आहे. अत्यावश्यक वैद्यकीय उपचारासाठी रुग्णाची वाहतूक करण्याची वेळ आल्यास रेल्वे फाटक बंद राहण्याचा प्रकार जीवावर उठण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.

**रेल्वेकडून वेगवेगळे नियम?**

दक्षिण मध्य रेल्वेच्या मार्गावरील फाटक क्र. ८७ जवळ रेल्वे मार्ग व रस्ता तयार करण्यासाठी अकोला ते मंगरूळपीर मार्गावरील वाहतूक ३ ते ५ जानेवारीदरम्यान रात्री १० ते सकाळी ५ वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आली. मात्र, मध्य रेल्वेच्या फाटक क्र. ३८ एची वाहतूक आठ दिवस २४ तासांसाठी बंद केली. रेल्वेकडून दोन फाटकांमध्ये फरक करून काम करण्यासाठी वेगवेगळे नियम लावले जातात का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## करूणा मुंडेंच्या कारमध्ये पिस्तुल ठेवणारा व्यक्ती...., सुरेश धस यांचा मोठा गौप्यस्फोट

विदर्भ प्रजासत्ताक
दि. ३ बीड : संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील तपास पथकात काही लोकांची बदली ही वाल्मिक कराड यांनी केली होती, म्हणून आम्ही त्यांची नावे घेतली आहेत. गडचिरोलीतील एकाची बदली वाल्मिक कराड यानी करून आणलेले आहे. गडचिरोलीतील बदली करून आणलेल्याने त्याची स्वामिनिष्ठा त्याने दाखवू नये. काही लोक अतिशय संपर्कात आहेत. ते देखील पुढे आलं आहे. त्याचबरोबर करूणा मुंडे यांच्या गाडीमध्ये पिस्तुल ठेवणारी व्यक्ती देखील दुसरी, तिसरी कोणी नसून ती बीड जिल्ह्यातील पोलिस दलातील व्यक्ती होती. त्याचे नाव देखील मला माहिती आहे. मात्र, ते बाहेर मी सांगणार आहे. मी एसपींना सांगेन. पोलिस दलामध्ये असे काही लोक असतील तर चार ते पाच लोकांवर काही आक्षेप नाही. मात्र, खालचे काही पोलिस आणि अधिकारी आहेत, त्यांच्यावरती आक्षेप आहे, त्यांच्याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना सांगितलं आहे, ते बोलले त्याबाबतची सर्व माहिती काढा, मी ती सर्व माहिती घेऊन मी त्यांच्याकडे जाणार आहे, अशी माहिती देखील यावेळी बोलताना सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

# अमृत महोत्सवी वर्षात आनंदवनला आर्थिक मदतीची गरज



विदर्भ प्रजासत्ताक
दि.३चंद्रपूर

दिवंगत बाबा आमटे व साधनाताई आमटे यांच्या परिश्रमतून उभे राहिलेले आनंदवन तथा महारोगी सेवा समिती अमृत महोत्सवी वर्षात आर्थिक अडचणीत सापडली आहे. संस्थेने यावर्षी ७५ वर्ष पूर्ण केली. पाच वर्षांपासून शासनाकडे संस्थेचे चार कोटी रुपये थकीत असल्याने संस्थेला आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागत आहे. संस्थेचे विश्वस्त कौस्तुभ आमटे यांनी समाजातील दानशूरांकडे आर्थिक मदतीचे आवाहन केले आहे.

बाबा व साधनाताई यांनी बचतीचा व योग्य आर्थिक नियोजनाचा संस्कार संस्थेत रुजवला, त्यामुळे संस्थेचे सेवाकार्य गेली ७५ वर्षे सुरळीतपणे पार पडू शकले. परंतु, गत काही वर्षांत जागतिक पातळीवर घडलेल्या घटनांचा संस्थात्मक पातळीवरही परिणाम झाला आहे.संस्थेच्या ग्रामीण भागातील प्रकल्पांत पुनर्वसित १ हजार ५१७ कुष्ठरोग मुक्त दिव्यांग-निराधार,वृद्ध-अनाथ-परित्यक्ता-मानसिकदृष्ट्या अपंग बांधव आणि त्यांची मुले, विशेष शाळा आणि व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रातील निवासी ३०४ दिव्यांग विद्यार्थी-प्रशिक्षणार्थी यांचे रोजचे दोन वेळचे जेवण, चहा, न्याहारी, आरोग्यसेवा, निवाससुविधा, वीजबिल, , शैक्षणिक मदत, या ठळक आणि इतर अनेक गोष्टींचे नियोजन संस्थेमार्फत करण्यात येते. त्याचबरोबर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सुरू अनिवासी विज्ञान, कला, वाणिज्य आणि कृषी महाविद्यालये, अनिवासी माध्यमिक शाळा, कृषी-तंत्र विद्यालय यांतील ३ हजार ५६५ विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या शैक्षणिक खर्चाचा मोठा भार संस्थेला उचलावा लागतो.

**आर्थिक मदतीसाठी खालील पत्यावर संपर्क साधावा.**


भ्रमणध्वनी क्रमांक ९९२२५५०००६, ई-मेल: kaustubh.amtemaharogisewasamiti.org

# नव वर्षात पृथ्वी सूर्यापासून कमीत कमी अंतरावर

## खगोलीय घटना; जीवसृष्टीवर कोणताही परिणाम नाही खगोल अभ्यासकांनी दिली माहिती

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

पृथ्वी सूर्याभोवती फिरते पण सूर्याभोवती पृथ्वी अचूक वर्तुळाकार मागनि फिरत नाही तर लब वर्तुळाकार मार्गाने फिरत असते. पृथ्वी कधी सूर्यापासून लांब असते तर कधि सूर्यापासून जवळ असते. साधारणतः दरवर्षी ३ जानेवारीच्या आसपास एखादा दिवस मागे-पुढे होऊ शकते. मात्र,या दिवशी पृथ्वी सूर्याच्या सर्वात जवळ असते. ३ जानेवारी रोजी पृथ्वी सूर्य हे अंतर सरासरी १४.७१ कोटी कि. मी. राहील. सरासरी नेहमी हे अंतर १५ कोटी कि.मी. असते. जीवसृष्टीवर या खगोलीय घटनेचा कोणताही परिणाम होणार नाही, अशी माहिती खगोल अभ्यासकांनी दिली.



या दिवशी पृथ्वी जूलै महिन्यापेक्षा सरासरी ५० लाख किमीने सूर्याजवळ असेल. पृथ्वी सूर्य अंतर कमी असणे बा खगोलीय घटनेला उपसूर्य असेही म्हटल्या जाते. सूर्य हा तप्त वायूचा गोळा असून यामध्ये हायड्रोजनपासून हेलियम बनण्याची क्रिया अहोरात्र चालू असते. सूर्याच्या केंद्रामध्ये एका सेकंदात ६५ कोटी ७० लाख टन हायड्रोजन जळते त्यापासून ६५ कोटी २५ लाख टन हेलीयम बनते, कमी झालेल्या ४५ लाख टन वस्तुमानाचे रुपांतर सौर उर्जेमध्ये होते. सूर्यामध्ये हायड्रोजन पासून हेलियम बनते. हा शोध १९३९ मध्ये हॅन्स बेथ या वैज्ञानिकाने लावला. सूर्यावर ज्या भागाचे तापमान कमी होते, त्या भागावर सौर डाग पडतात. या डागाचे चक्र ११ वर्षाचे असते, या डागाचा शोध १८४३ मध्ये श्वाबे नावाच्या वैज्ञानिकाने लावला. या डागाचे आजपर्यंत २३ चक्र पूर्ण झाले. फेब्रुवारी २००८ पासून २४ वे चक्र सुरु झाले. सूर्याला आकाशगंगेच्या मध्याभोवती १ चक्कर मारण्यास २२५ दशलक्ष वर्ष लागतात. सूर्य हा आकाशगंगेच्या मध्याभोवती २५० कि. मी. प्रति सेकंद या वेगाने फिरत आहे. आजपर्यंत सूर्याचे २० चक्कर पूर्ण झाले. सूर्याचे वय निश्चित करणारे पहिले वैज्ञानिक सर आॅर्थर एडींग्टन हे होय. सूर्याचे एकूण आयुष्य १० अब्ज वर्ष आहे. त्यापैकी ५ अब्ज वर्ष संपले आहे. आणखी ५ अब्ज वर्षांनी सूर्याचा मृत्यू हा श्वेत बटू ताऱ्यात होईल. ३ जानेवारीच्या खगोलीय घटना घडणार आहे. याचा जीवसृष्टीवर कोणताही परिणाम होणार नाही. अशी असे मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रविण गुल्हाने, हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी सांगितले.

# 'रेझिंग डे' पोलीस आयुतांच्या हस्ते उद्घाटन : ८ जानेवारी पर्यंत विविध कार्यक्रम

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

दरवर्षी २ ते ८ जानेवारी दरम्यान पोलिस वर्धापनदिन 'रेझिंग डे' साजरा करण्यात येते. त्यात समाजातील वातावरण सुरक्षित राहावे तसेच जनतेमध्ये पोलिस दलाप्रती विश्वास निर्माण होण्याचे दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी २ जानेवारी रोजी सकाळी स्थानिक पोलिस कवायत मैदानात पोलिस वर्धापनदिन-२०२५ चे उद्घाटन केले.

रेझिंग डेनिमित्त प्रदर्शनातील शस्त्र, सायबर, महिला व बाल अत्याचार, दामिनी पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, डायल-११२, दंगा नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथक, श्वान पथक, बिनतारी संदेश विभाग, वाहतूक शाखा,फिंगर प्रिंटचे विविध स्टॉल लावून पोलिस दलातील आधुनिक यंत्रसामग्रीची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. हे प्रदर्शनी पुढील दोन दिवस पोलिस कवायत मैदान येथे विद्यार्थी व नागरिकांसाठी खुली असेल. या प्रदर्शनीचा लाभ घेण्याचे आवाहन पोलिस आयुक्तांनी उद्घाटनप्रसंगी केले.



यावेळी उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे व सागर पाटील यांच्यासह सहायक आयुक्त व ठाणे वशाखा प्रभारी अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. गुरुवारी नवोदय विद्यालय नवसारी, मनपा माध्यमिक मराठी शाळा वडरपुरा, अमरावती पोलिस पब्लिक स्कूल पोलिस मुख्यालय, जि.प. माध्यमिक कन्या शाळा कॅम्प अमरावती, जि. प. उर्दू शाळा, मनपा उर्दू माध्यमिक शाळा जमील कॉलनी अमरावती येथील विद्यार्थ्यांनी पोलिस दलाच्या कामकाजाची जवळून माहिती घेतली.

# बाजारात तीळ २०० तर गूळ ७० रुपये किलो : मकर संक्रांतीनिमित्त तिळाची मागणी; यंदा दर वाढल्याने गृहिणी अडचणीत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

येत्या आठवड्यांवर यंदाची संक्रांत येऊन ठेपली आहे. मात्र, अशातच वाढत्या महागाईने जनसामान्य नागरिकांवर संक्रांत आणली आहे. तीळ आणि गुळाचे भाव गगनाला भिडले असल्याने संक्रांत गोड करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

मकरसंक्रांतीच्या सणानिमित्त ग्रामीण भागातील आठवडी बाजारात सध्या तीळ आणि गुळाची आवक आहे. आठवडयातील बाजारात पांढऱ्या रंगाचे तीळ व गुळ विक्रीसाठी आला आहे. त्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे या गोडव्याची चव यंदा कडवट दिसत आहे. तिळाचे भाव २०० रुपये तर गुळाचे भाव ६० ते ७० रुपये किलो आहेत. या सोबतच शेंगदाणा हे १३० रुपये किलो पर्यंत पोहोचले आहे. भारतात सण-उत्सव सुरूच असतात. सण आला म्हणजे त्यासोबत गोड पदार्थही आलेच. प्रत्येक सणासाठी काही विशिष्ट गोड पदार्थ तयार केले जातात. मकर संक्रांतीला तीळ-गुळाचे



पदार्थ तयार केले जातात. तीळ-गुळाचे लाडू, चिक्की असे वेगवेगळे पदार्थ तयार केले जातात. तीळ हे उष्ण असतात त्यामुळे आपल्या शरीराला त्याचा फायदा होऊ शकतो. त्यामुळे तीळ आणि गुळाचे पदार्थांचे सेवन केल्याने शरीरात गर्मी तयार होते. त्यामुळे मकर संक्रांतीला तीळ-गुळाचे पदार्थ तयार केले जातात.

यंदा तीळ व शेंगदाणा यांचे भाव गगनाला भीडत असल्याचे दिसत आहे, त्यामुळे यंदा तीळ गूळ खा म्हणणाऱ्यांची संख्या कमी होणार असल्याचे चित्र आहे, त्यामुळे गृहिणीच्या अडचणीत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. गुळ ७० शेंगदाणा १३० तीळ २०० असे आहेत भाव (प्रतिकिलो)

**तिळाचे असे आहेत फायदे**

दातांच्या बळकटी साठी तिळाचा चांगला उपयोग होतो. तीळ खाण्यामुळे त्वचा मुलायम राहते. तिळात तेल असल्याने त्वचेची कांती सुधारते. त्वचा कोरडी पडत नाही. केसांची वाढ चांगली व्हावी यासाठी तिळाचे तेल केसांना लावणे चांगले असते. थंडीच्या वेळी लसूण, खोबरे घालून केलेली तिळाची चटणी खाणे चांगले. तीळ पचायला जड असल्याने थंडीमध्ये भूक शमवण्यासाठी भाकरीला तीळ लावून खाण्याची पद्धत आहे.

# राज्यातील सामाजिक संस्थांना सोबत घेऊन शेतकरी हिताचे उपक्रम राबवणार : बच्चू कडू

## अभिनेते नाना पाटेकर यांच्या सोबत चर्चा केल्यानंतर घेतला निर्णय : शेतकऱ्यांच्या अनेक योजना लागणार मार्गी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

महाराष्ट्रामध्ये शेतकरी, गरजवंत लोकांसाठी झटत असलेल्या संस्थांची मोट बांधून राज्यभरात विविध प्रकल्प उभारण्याची योजना प्रहार संस्थापक बच्चू कडू यांनी आखली आहे. त्यांनी बुधवारी(दि.१) रोजी जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांची भेट घेत विविध विषयांवर चर्चा केली, आणि एका छताखाली सर्व संस्थांना घेवून बहुउद्देशिय प्रकल्प हाती घेण्याचे प्राथमिक नियोजन केले.बच्चू कडूंनी सांगितले की, आमदार असताना कामाच्या व्यापामूळे अनेक अश्या जनहिताच्या योजना आहेत, ज्या शासनाच्या मर्यादेत येत नाहीत, परंतू सामाजिक संस्थांना करणे सहज शक्य आहे, अश्या जनहिताच्या मोठ्या योजना देशातील नामांकित संस्थांच्या



साथीने उभारुन त्या पुर्णत्वास नेण्याची योजना आखण्यात आली आहे. बच्चू कडू हे पुणेतील प्रहार रुग्णसेवक नयन पुजारी, नौशाद शेख यांनी गरिबांसाठी फक्त ३० रुपयांत ओपीडी असलेल्या एका हॉस्पिटल च्या उदघाटना निमित्ताने पुणे दौऱ्यावर होते. योगायोगाने जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या वाढदिवसानिमीत्त बच्चु कडू यांनी नानां ना दूरध्वनी द्वारे शुभेच्छा दिल्या. नानांनी बच्चु कडू यांना घरी भेटायला येण्यास निमंत्रण दिल्यानंतर सायं ६ वाजता बच्चु कडू यांनी नाना पाटेकर यांच्या डोणजे येथील निवासस्थानी जाऊन नानांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी दोघांमध्ये जवळपास तासभर विविध विषयांवर चर्चा झाली. स्वामिनाथन आयोगापासून ते शेतक:यांच्या प्रश्नांवर मंथन झाले. त्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने पिकवलेल्या मालाला आज योग्य भाव मिळणे कठीण झालेले आहे, त्यामुळे नवनवीन शेतकरी हे नैराश्यात जात आहे, शेतकऱ्यांनी पिकवलेल्या दर्जेदार मालाला योग्य भाव मिळून देण्यासाठी 'थेट शेतकरी ते ग्राहक' तसेच 'मागणी तसा पुरवठा' तत्त्वावर काही मोठ्या शहरांमध्ये प्रयोग राबवता येईल का यावर सविस्तर चर्चा झाली,यातून राज्यातील व राज्याबाहेरील संस्थांना एकत्र आणून शेतकरी, पाणी, माती, पशुसंवर्धन यांच्या संरक्षणार्थ काम करण्यावर चर्चा झाली, गाव खेड्यातील अपंग, दिव्यांग, विधवा, परितक्त्या, गरजवंत एकल महिला तथा महिला बचत गटाच्या काही उद्यमशील महिलांना शेळी गटाचे वाटप करून यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे तसेच गरजवंताकरिता नाममात्र पैश्यांमध्ये महागड्या सुविधा कश्या उपलब्ध करवून द्यायच्या, यावरही चर्चा करण्यात आली. यावेळी बच्चु कडू यांच्यासोबत आलेले त्यांचे चिरंजीव देवा कडू यांची सुद्धा नानांनी आपुलकीने चौकशी केली. बच्चु कडू यांच्या समवेत उद्धव ढवळे, महेश बडे, मनोज भोजने आदी उपस्थित होते. बच्चू कडू यांनी अचलपूर मतदारसंघात प्रत्येक गावात धरणातून शुद्ध पिण्याच्या पाण्याची योजना कार्यान्वित केलेली आहे, योजनेला पुढील भविष्यात काही देखभाल दुरुस्तीच्या कामावर योग्य नियोजन करणे आवश्यक आहे, त्याकरता गेल्या कित्येक वर्षापासून पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण येथे सदिच्छा भेट दिली. बच्चु कडू यांना खडकवासला धरणाची माहिती शाखा अभियंता गिरीजा कल्याणकर-फुटाणे व इतर कर्मचा:यांनी दिली.

# फवारणीच्या ड्रोनसाठी आता चार लाखांचे अनुदान

## कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाचा शेतकऱ्यांना होणार लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

केंद्र शासन पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियानात कीटकनाशक, सूक्ष्म अन्नद्रव्ये व खतांच्या फवारणीसाठी कृषी विभागाद्वारे शेतकऱ्यांना ड्रोन देण्यात येणार आहेत. यामध्ये खरेदीच्या ४० टक्के किंवा ४ लाखांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. ड्रोन वापरामुळे शेतकऱ्यांच्या खर्चात, वेळेत व श्रमात बचत होऊन रोजगारनिर्मिती होऊ शकते. या अभियानात आता ड्रोन या घटकाचा समावेश करण्यात आलेला आहे. शेतकऱ्यांना ड्रोन खरेदीसाठी अनुदानही दिले जाणार आहे. राज्यात यंदा ड्रोन खरेदीसाठी आराखडा मंजूर करण्यात आलेला आहे.



यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था, याशिवाय कृषी व तत्सम पदवीधर लाभार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. ड्रोनसाठी शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करता येणार आहे.शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था, कृषी व तत्सम पदवीधर, अनुसूचित जाती-जमाती, . लहान व सीमांतिक महिला शेतकरी या योजनेसाठी अर्ज करू शकतात. जिल्ह्यात अनेक वेळा फवारणीसाठी मजूर मिळत नाही तसेच उंच वाढलेल्या पिकांवर फवारणी करणे अशक्य होते. अशावेळी ड्रोन उपयुक्त ठरणार आहे.शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी सहकारी संस्था, कृषी व तत्सम पदवीधर आणि अनुसूचित जाती-जमाती, लहान व सीमांतिक महिला शेतकऱ्यांसह सर्वसाधारण शेतकरीही ड्रोनसाठी अर्ज करू शकतात.



**ड्रोनने फवारणीचा काय फायदा?**

ड्रोन वापरामुळे शेतकऱ्यांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होऊ शकते. ड्रोन वापरामुळे शेतकऱ्यांच्या श्रमात बचत होऊन रोजगार निर्मिती होऊ शकते.

उंच पिकांना फवारणी करता येत नाही. अशा पिकावर फवारणीसाठी ड्रोन उपयुक्त ठरणार आहे.

पारंपरिक पद्धतीने फवारणी करणे शेतकऱ्यांसाठी त्रासदायक आणि अधिक वेळ लागतो. मात्र ड्रोनमुळे अवघ्या काही तासात फवारणी केली जाऊ शकते.

**महाडीबीटी पोर्टलवर करा अर्ज**

कृषी यांत्रिकीकरण या घटकांत ड्रोन हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यामुळे सन २०२४-२५ मध्ये ड्रोन हा घटक ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.

# ईरइ धरण परिसरात अतिशय दुर्मिळ अल्बिनो गढवाल बदक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३चंद्रपूर**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पा लगतच्या ईरई धरण परिसरात अतिशय दुर्मिळ असलेला दुर्मिळ अल्बिनो गढवाल बदक आढळला आहे. पक्षी मित्र तथा अभ्यासकांनी हा बदक पाहण्यासाठी गर्दी केली आहे.

दरवर्षी प्रमाणे यंदाही चंद्रपुरात विदेशी स्थलांतरित पक्ष्यांनी आगमन करण्यास सुरुवात केली आहे, थंडी पासून बचाव तसेच अन्नाच्या शोधात अतिशय दुरवर हजारो किलोमीटर अंतर प्रवास करून ते चंद्रपुरात दाखल झाले आहेत. विदेशी स्थलांतरित पक्ष्यांमध्ये मोठी लालसरी, चक्राग बदक, चक्रवाक, काणुक बदक,भुवयी बदक, गढवाल, तलवार बदक हे पक्षी मोठ्या प्रमाणात आले आहेत.

यंदा मात्र अतिशय दुर्मिळ अल्बिनो गढवाल ईरई धरण परिसरातील काटवल तुकूम तलावात आढळून आला आहे.गढवाल (-परी डीशशिर) हा बदकापेक्षा लहान, त्यांच्या पोटाचा भाग पांढरा, शेपटी काळीभोर असते, पंखावरती पांढरा डाग असतो. त्याच्या पंखांची काळी किनार उडताच ठळकपणे दिसून येते.गढवाल हे युरोप आणि उत्तर अमेरिका या भागांतून स्थलांतर करून येतात. अल्बिनीझम हा एक आनुवंशिक प्रकार असुन पक्ष्यांच्या शरीरात मेलेनीन या रंगद्रव्याची जन्मजात अभावामुळे पांढरा रंग दिसतो.केस, पंख, खवले व त्वचा पांढरी आणि लालसर गुलाबी किंवा निळे डोळे होतात.

अल्बिनो पक्ष्यांची पंख कमकुवत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना त्यांना करावा लागतो या कारणांमुळे अल्बिनो पक्षी फार काळ जगत नाही.साधारणता अशा प्रकारचे पक्षी किंवा प्राणी निसर्गात क्वचितच आढळतात कारण त्यांच्या पांढऱ्या रंगामुळे ते लवकर भक्ष्य बनतात. अतिनील विकिरणांपासुन संरक्षण नसल्यामुळे भक्षकांपासुन दुर राहण्यासाठी क्षमता नसल्याने अल्बिनोचा जगण्याचा सरासरी कालावधी कमी असतो.अशी माहिती प्राणीशास्त्र संशोधन अभ्यासक शुभम संजय आत्राम यांनी दिली. शुभम संजय आत्राम (पक्षी संशोधन अभ्यासक), प्रा.डॉ. नरेंद्र हरणे, सुमेध वाघमारे, ,डॉ.हर्षद मटाळे,सुलेमान बेग यांना पक्षी निरीक्षणात दुर्मिळ अल्बिनो गढवाल आढळून आला.दुर्मिळ असलेला पक्षी दिसल्याने चंद्रपूरच्या पक्षीप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# सावधान....!उघड्यावर शौच्छास बसल्यास होणार दंड

## सिईओ संजिता महापात्र यांचे निर्देश : पहीले दोन आठवडे पुष्प देवुन करणार सर्तक

## गावस्तरावर दक्षता समितीमार्फत मोहिम : ७ जानेवारीपासून कारवाइची अंमलबजावणी



विदर्भ प्रजासत्ताक बातमीचा इम्पेक्ट


विदर्भ प्रजासत्ताक
गुड मॉर्निंग पथके गेली कुठं?
घर तिथे शौचालय असूनही वापराच्या नावाने बोंबाबोंब



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**


जिल्ह्यातील गावांमध्ये उघड्यावर शौचास जात असलेल्या ग्रामस्थांवर स्थानिक दक्षता समिती मार्फत कारवाईचे आदेश दिले आहे. याची अंमलबजावणी ७ जानेवारी पासून होणार आहे. उघडयावर शौचास बसल्यास कायदेशीर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तत्पूर्वी पहीले दोन आठवडे पुष्प देवुन त्यांना सतंक केले जाईल. त्यानंत दंडाची कारवाई केली जाणार आहे.विशेष म्हणजे लोकप्रिय सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक दि.२०डिसेंबर लागुड मॉर्निंग पथक गेली कुठं? हे वृत्त प्रकाशित करण्यात आले होते त्या वृत्ताची दखल घेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी ऍक्शन घेत १४ ही पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकारी यांना कारवाईच्या सूचना दिल्यात.

अमरावती जिल्ह्यातील काही गावांमध्ये अद्यापही ग्रामस्थ उघड्यावर शौचास बसून गावाच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करित आहे. अशा तक्रारी प्राप्त झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, संजिता महापात्रया ॲक्शन मोडवर आल्या असून त्यांनी गुरूवारी तातडीने १४ पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकारी यांना पत्राव्दारे कारवाईच्या सुचना दिल्या आहेत. ग्रामस्तरावर रहागणदारीमुक्त गावं निगराणी समिती तथा दक्षता समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचे अध्यक्ष हे ग्राम पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष असून यामध्ये ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत अधिकारी,शिक्षक,पोलीस पाटील,अंगणवाडी सेविक, आशा, स्वच्छग्रही यांचा समावेश करण्यात आलेला आहे. यामधील स्वच्छाग्रही यांना गुडमार्निंग किट सुध्दा वितरीत करण्यात आली आहे. त्यामध्येटॉर्च, व्हीसल, कॅप, टी-शर्ट, सॅक ई. साहित्य देण्यात आले आहे. ग्रामस्तरावर गठीत करण्यात आलेल्या रहागणदारीमुक्त गावं निगराणी समिती तथा दक्षता समितीर ने ७ जानेवारी पासून आठवडयातूनकोणतेही तीन दिवस नियमीत पणे गुडमॉर्निग किवा गुडईव्हनिग उपक्रम राबवून उघड्यावर शौचास बसणाऱ्या ग्रामस्थाना प्रथम दोन आठवडे गावस्तरावर उपलब्ध होणारे पुष्प देवून उघडयावर शौचास बसण्याच्या कृतीचा प्रतिकात्मक विरोध केल्या जाणार आहे. त्यानंतर तिसऱ्या आढवड्यापासून, उघडयावर शौचास बसणाऱ्या ग्रामस्थांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलमानुसार तसेच मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ११५ ते ११७ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल. सदरच्या उपक्रमाचे सनियंत्रणासाठी तालुकास्तरावरुन विस्तार अधिकारी किवा समकक्ष अधिकारी यांची १० ग्रामपंचायती करिता नेमणूक करण्यात येणार आहे. ७ जानेवारी पासून पुढील २ महिण्याचे दैनिक नियोजन ५ जानेवारी पुर्वी पाठविण्यात यावे. असे निर्देश गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहे. प्राप्त नियोजना नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, संजिता महापात्र ह्या सुध्दा गुडमॉर्निग उपक्रमास आकस्मीक भेटी देणार असल्याने गटविकास अधिकारी ही चांगलेच धास्तावले आहेत.

# पेट्रोल पंपावर खाजगी बसस्थानक , साहेब प्रवाशांचे जीव धोक्यात आले : खाजगी बसांची परवाना मुदत संपली , आरटीओ पथक बेखबर

**विर्भ प्रजासत्ताक**
**दि.३परतवाडा**

परतवाडा येथील बसस्थानक समोर खाजगी बसांनी चांगलाच धिंगाणा घातला आहे , चक्क परिवहन महामंडळाच्या बसस्थानक समोरील पेट्रोल पंपावर खाजगी बस मालकाने आपला बसस्थानक तयार करून येथूनच बस मध्ये प्रवाशांना बसवण्याची सोय केली आहे , चक्क प्रवाशांचा जीव धोक्यात टाकून या पेट्रोल पंपा वरून बसांची वाहतूक अमरावती करीता करण्यात येत आहे ,परतवाडा वरून अमरावती अंजनगाव अकोट मार्गे अकोला , धारणी , खंडवा , बऱ्हाणपूर , घटांग पासून चुरणी जारीदा , परतवाडा बैतूल , मोर्शी वरुड मार्गावरून पांढुर्णा मार्गावर दिवस मावळल्यापासून ते रात्र होईपर्यंत खाजगी बसांच्या फेऱ्या सुरू असतात , परतवाड्यावरून विविध मार्गावर धावणाऱ्या अधिकांश खाजगी बसांची परवाना मुदत संपल्यावरही फेहऱ्यावर फेऱ्या कोणाचे आशीर्वादाने सुरू आहे हे मात्र कोणाला कळेना , नियमांना ओलांडून सुरू असलेल्या या प्रवासी खेळामुळे नागरिकांचे जीव धोक्यात आले आहे , जिल्हा परिवहन अधिकारी , ग्रामीण पोलीस अधीक्षक , शहर पोलीस आयुक्त , पोलीस वाहतूक विभाग यांच्या नजरेसमोर खाजगी बस संचालकांनी हा मृत्यू खेळ कसा मांडला याचा विचार केला तर तू भी चूप , मैं भी चूप भूमिका घेत , प्रवाशांच्या जीवाशी खेळणारा नाटक चक्क विविध मार्गावर दिवस-रात्र सुरू आहे , बस स्थानक समोरील अवैध बसस्थानक निर्माण करणाऱ्या खाजगी बस संचालकांवर



कारवाई होणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे

**विनापरवाना जीवघेणी वाहतूक**

परतवाडा वरून अमरावती , अंजनगाव , अकोट , अकोला , धारणी, खंडवा , बऱ्हाणपूर, चुरणी जारीदा , बैतूल , मोर्शी वरुड मार्गावरून पांढुर्णा कडे धावणाऱ्या अधिकांश खाजगी बसांची परवाना मुदत संपल्यावर ही बस संचालक बसांच्या फेऱ्या नियमांचे उल्लंघन करून मारत आहे , ज्यामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात आले असून , आरटीओ ,पोलीस विभाग आंधळे झाले आहे

**आरटीओ पथक बेखबर**

जिल्हा प्रादेशिक परिवहन कार्यालयातील आरटीओ पथक हरपले कुठे , असा सवाल उपस्थित झाला आहे , दिवसापासून तर रात्र होईपर्यंत विनापरवाना नियम ओलांडून धावणाऱ्या खाजगी बसांच्या कागदपत्रांची तपासणी करण्याची जबाबदारी घेणारे विभागच जर झोपेत असेल तर बस संचालकांची मनमानी अशी कशी चालणार नाही , हा काही नवीन सवाल नाही , बस संचालकांना नियम ओलांडून बसांच्या फेऱ्या मारण्याची परवानगी दिली कोणी याचे उत्तर प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे सुद्धा नाही

**पेट्रोल पंपवरील अवैध बस स्थानकावर कोन करणार कारवाई**

परतवाडा महामंडळाच्या बस स्थानक समोरील पेट्रोल पंपावर खाजगी बस मालकाने अवैध रित्या निर्माण केलेल्या बस स्थानकावर कारवाई कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे, पेट्रोल पंपावर खबरदारी घेण्याची प्रथम अशी जबाबदारी आहे , ज्वलनशील वस्तू , विस्फोटक पदार्थ , पेट्रोल पंपावर नियमानुसार नेता येत नाही , दूरध्वनीचे वापर , बिडी , सिगारेट येथे भडकवू शकत नाही असे केल्यास मोठा नुकसान होऊ शकते , एखाद्या प्रवाशांनी जर पेट्रोल पंपावर अवैधरित्या निर्माण केलेल्या खाजगी बस स्थानकावर बिडी , सिगारेट भडकवली तर मोठा अग्नितांडव होण्याची शक्यता आहे, या पेट्रोल पंपला लागूनच अनेक नागरिकांची वसाहती आहे , काहीच अंतरावर खाजगी रुग्णालय आहे , हे ठिकाण नागरिकांचे गर्दीचे असून शासनाने याकडे लक्ष देऊन त्वरित कारवाई करण्याची गरज आहे.